दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२ | शुक्रवार दि.३ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शेती विषयांची केवळ टोलवाटोलवी...

कांद्यावर लादण्यात आलेल्या निर्यातबंदीने सरकारला ऐन निवडणुकीत शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागते आहे. त्यामुळे भाजप व मित्रपक्षांच्या उमेदवारांची पळता भुई थोडी होत आहे. त्यातच गुजरातच्या पांढ्या कांद्यास निर्यातीची मंजुरी दिली जाते आणि कांदा उत्पादकांच्या जखमेवर अक्षरश: मीठ चोळले जाते. साहजिकच राज्यातील शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक होतोय.

### २ जी स्पेक्ट्रम प्रकरणी केंद्राची याचिका स्वीकारण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

नवी दिल्ली: टूजी स्पेक्ट्रम प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात सुधारणा करण्याच्या केंद्र सरकारच्या मागणीला दणका बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने केंद्राची याचिका फेटाळली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने केंद्राच्या याचिकेला गैरसमजावर आधारित आणि स्पष्टीकरणाच्या नावाखाली सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. २ जी स्पेक्ट्रम प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने २०१२ मध्ये दिलेल्या एका आदेशात म्हटले होते की, देशातील नैसर्गिक संसाधनांचे वाटप लिलावाद्वारेच केले जाऊ शकते. केंद्राने या निर्णयात दुरुस्तीची मागणी केली होती.

# इथेनॉल निर्मितीच्या परवानगीवरून संभ्रम

## कांदा उत्पादकांप्रमाणेच ऊस उत्पादकांनाही सरकारने गंडवले?

**पुणे । प्रतिनिधी**

**महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी बी हेवी मोलॅसिसवरील बंदी उठवल्याची घोषणा केल्याने साखर उत्पादकांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे, मात्र प्रत्यक्षात सरकारने असा निर्णय घेतल्याचे कसलेच पत्रक किंवा शासनादेश काढलेला नाही. यामुळे कांदा उत्पादकांप्रमाणेच ऊस उत्पादकांनाही सरकारनें गंडवले की काय याबाबत शंका** व्यक्त केली जात आहे.



... निवडणुकांमध्ये ऊस उत्पादक पट्ट्यात फटका बसू शकतो, अशी शक्यता लक्षात येताच केंद्र सरकारकडून इथेनॉल निर्मितीच्या परवानगीची बातमी पेरली ... कारखान्यांकडे शिल्लक होता. त्यापासून इथेनॉल निर्मिती करण्यात आली तर साठा वाया जाणार होता. त्यामुळे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची भेट घेतली. शहा यांना इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध उठवण्याची विनंती केली. मात्र केंद्र सरकारने या विनंतीला गांभीर्यानं घेतले नाही. पण मागच्या आठवड्यात मात्र लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान इथेनॉलवरील निर्बंधाचा फटका बसू शकतो, अशी शक्यता लक्षात येताच केंद्र सरकारच्या वतीने महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी बी हेवी मोलॅसिसवरील बंदी उठवल्याची घोषणा करून टाकली. प्रत्यक्षात मात्र या घोषणेचा शासन निर्णय आलाच नाही. त्यामुळे संभ्रम निर्माण झालेला आहे. याआधी केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी उठवल्याची अशीच अफवा उठवली होती. परंतु प्रत्यक्षात कांदा निर्यातबंदी उठवण्यात आलेली नाही.



### अमोल तरटे, अण्णासाहेब चौधरींच्या प्रवेशाने शरद पवार गटाची ताकद वाढली

**आष्टी तालुक्यात भाजप, अजित पवार गटाला खिंडार**

**आष्टी । प्रतिनिधी**


भाजपचे अमोल तरटे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आष्टीचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब चौधरी यांच्यासह सुनील नाथ, अशोक मस्के यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाने आष्टी तालुक्यात भाजप, अजित पवार गटाला खिंडार पडले असून शरद पवार गटाची ताकद वाढली आहे. त्यांच्या प्रवेशाबद्दल सावरगाव कोठी येथे इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी त्यांचा सत्कार करीत पक्षात स्वागत केले.

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील भाजपचे कार्यकर्ते अमोलराजे तरटे, आष्टीचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के ◀◀ पान २ वर

# लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात राजकीय भुकंप होणार?

## नरेंद्र मोदींनी दिले संकेत; उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत, उद्या संकट आले तर मदतीला पहिले धावून जाईन





**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या मुलाखतीने महाराष्ट्राच्या राजकारणात दुरगामी परिणाम पडतात का? ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण देशात सध्या लोकसभा निवडणूक सुरु आहे. त्यानंतर लगेच सहा महिन्यांनी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. अशा वातावरणात नरेंद्र मोदींनी एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत, उद्या संकट आले तर मदतीला पहिले धावून जाईन असे महत्त्वाचे ◀◀ पान २ वर

### उद्धव ठाकरेही म्हणाले होते, 'मोदी माझे शत्रू नाहीत'

विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांनीदेखील भाषणात नरेंद्र मोदी यांच्याबद्दल असेच वक्तव्य केले होते. नरेंद्र मोदी माझे शत्रू नाहीत, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते. त्यानंतर मोदींनी उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत, असे म्हटले आहे.

### 'मी ते कर्ज कधीच विसरु शकत नाही'

'बाळासाहेबांचे माझ्यावर अतिशय प्रेम होते . मी ते कर्ज कधीच विसरु शकत नाही. कर्ज विसरु शकत नाही. आमच्याकडे सर्वाधिक आमदार आहे. तरीही शिवसेनेचा मुख्यमंत्री आहे. ती मी बाळासाहेबांना वाहिलेली श्रद्धांजली आहे. आम्ही मागच्या निवडणुकीत आमनेसामने लढलो होतो. मी त्या निवडणुकीत बाळासाहेबांबद्दल एक शब्दही बोललो नव्हतो. मी जाहीरपणे म्हणाालो होतो की, मला उद्धव ठाकरेंनी कितीही शिव्या दिल्या तरी मी बोलणार नाही. कारण माझी बाळासाहेबांवर श्रद्धा आहे. त्यामुळे त्यांच्या कौटुंबीक समस्या काय आहेत, तो माझा विषय नाही. पण मी बाळासाहेबांचा प्रचंड आदर करतो. आणि आयुष्यभर मी त्यांचा आदर करत राहीन'', असे नरेंद्र मोदी म्हणाले.

# गोदावरीचे पाणी सिंदफणेत आणण्यासाठी प्रयत्न करणार!

**गेवराई । प्रतिनिधी**

**जिल्ह्याचे सिंचन क्षेत्र वाढवून हा भाग सुजलाम सुफलाम व्हावा आणि शेतकरी राजा सुखी व्हावा. म्हणून गोदावरीचे पाणी सिंदफणेत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे बोलताना दिले.**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री लोकनेते बदामराव आबा पंडित, प्रदेश प्रवक्त्या सुशीला मोराळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, पंढरीनाथ लगड, अण्णासाहेब राठोड, महेश बेदरे, विक्रम दाभाडे , दिनकर पवार हे गेवराई तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन मतदारांची सुसंवाद साधत आहेत. बजरंग बप्पा सोनवणे यांनी गेवराई तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी मादळमोही येथील झालेल्या सभेत पालकमंत्र्यांना उद्देशून म्हणाले की, मागील दहा वर्षां पूर्वी ◀◀ पान २ वर

### बापुराव धोंडे यांचे निधन

**आष्टी । प्रतिनिधी**




आष्टी तालुक्यातील महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन,माजी आ.भीमराव धोंडे यांचे लहाण बंधु ,लोणी सय्यदमीर जि.प.गट. आणि हरिनारायण आष्टा जि.प.गटाचे माजी सदस्य,शेतकरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन शेतकरी सहकारी सुतगिरणीचे माजी चेअरमन आणि शेतकरी शिक्षण संस्थेचे संचालक बापुराव आनंदराव धोंडे (वय ५५) यांचे गुरुवारी पहाटे ◀◀ पान २ वर

# मुस्लिम बांधवांना विकास आणि संरक्षण दोन्हीही देण्याची जबाबदारी माझी-पंकजाताई मुंडे

## पंकजाताई मुंडे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा मुस्लिम बांधवांचा निर्धार

**तेलगाव । प्रतिनिधी**

**लोकनेते मुंडे साहेबांना मुस्लिम बांधवांनी नेहमीच साथ दिली आहे, तशीच साथ मलाही मिळत आहे. विरोधक भूलथापा मारुन मुस्लिम बांधवांना भाजपच्या विरोधात घाबरवतात पण त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. तुमच्या केसालाही धक्का लागला तर सर्वात अगोदर मी पुढे येईल. काळजी करू नका, तुमचा विकासच तर मी करेनच पण तुमचे संरक्षणही करण्याची जबाबदारी मी घेते असा विश्वास भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी येथे बोलतांना दिला.**



पंकजाताई मुंडे यांनी आज दिंद्रुड व तेलगाव येथे मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला. दिंद्रुड येथे ईद ए-मिलाद कार्यक्रमात मुस्लिम बांधवांना त्यांनी मनमोकळा संवाद साधत शुभेच्छा दिल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी आ. प्रकाश सोळंके, मोहनराव जगताप, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबूराव पोटभरे, ज्येष्ठ नेते राजाभाऊ मुंडे, मौलाना फारूक, शेख अखिल, चांदभाई, शिवाजी बडे, नईम शेख आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, माझ्यावर विश्वास ठेवा, कारण माझ्या नावापुढे गोपीनाथ मुंडेंचे नाव लागले आहे. मी सर्व जाती धर्मावर नेतृत्वाची सावली होईन, त्यामुळे तुमची लेक म्हणून मला मतांची ओटी भरा. माझा विजय म्हणजे तुमचा विजय आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच ◀◀ पान २ वर

### २ हजारांच्या ७ हजार ९६१ कोटी रुपयांच्या नोटा चलनातच

नवी दिल्ली : चलनामध्ये सध्या २ हजार रूपयाच्या ७ हजार ९६१ कोटी रूपयाच्या नोटा असल्याची माहिती आरबीआयकडून देण्यात आली आहे. त्यामुळे नेमक्या नोटा किती हे सर्वांना कळले आहे.

# सेक्स स्कँडल आरोपी प्रज्वल रेवन्ना मोदी-शहांच्या नाकाखालून परदेशी पळाला-काँग्रेसचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचा कर्नाटकातील मित्रपक्ष जेडीएसचा उमेदवार प्रज्वल रेवन्ना याने हजारो महिलांवर लैंगिक अत्याचार केले. रेवन्नाने ब्लॅकमेल करुन महिलांवर अत्याचार केले व त्यांचे व्हिडिओही बनवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या नराधमासाठी मते मागितली तर देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी याचा उल्लेख श्री. रेवन्ना असा केला. प्रज्वल रेवन्नाने केलेले गुन्हे अत्यंत गंभीर असून त्याच्या मुसक्या आवळून ◀◀ पान २ वर




# सहा हजार कोटी पंतप्रधान कार्यालयाकडून वसूल

## प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

**धाराशीव । प्रतिनिधी**

साडे सहा हजार कोटी रुपये पंतप्रधान कार्यालयाने वसूल केले आहेत. मी स्वत:चे काहीच बोलत नाही. त्यांनी मला अटक करावी, असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी धाराशीव येथे दिले. ते वंचित बहुजन आघाडीच्यावतीने आयोजित येथील जाहिर सभेत ते बोलत होते.



प्रकाश आंबेडकर म्हणाले की, १९८० पासून ते २०२४ अशा काळात इंदिरा गांधी ते मोदी असे सगळे पंतप्रधान पाहिले. यामध्ये ◀◀ पान २ वर

### आज अंबाजोगाई येथे सभा

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या प्रचारार्थ प्रकाश आंबेडकर यांची दिनांक ३ मे रोजी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे जाहीर सभा होणार आहे. या सभेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२ मे २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :११.०० क्विंटल | २,०७१ | २,५०० | २,३१९ |
| ज्वारी/हायब्रिड : १११.०० क्विंटल | १,७२१ | ३,३७० | २,४९३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ४५.५० क्विंटल | २२ | १०,५५० | ९,५०२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ३२.०० क्विंटल | २,००१ | २,६५३ | २,४३४ |
| चिंच/लोकल: १४.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| सोयाबीन: ८.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ४,५०० | ६,३५० | ५,५६२ |

# जयदत्त अण्णांची चाय पे चर्चा; हॉटेलात जावून चहा घेण्यात नेमकं दडलयं काय?

## साडे चार वर्षानंतर जयदत्त क्षीरसागर ॲक्टिव मोडवर; कार्यक्रमांमधील वावर ठरतोय लक्षवेधक

**बीड । प्रतिनिधी**

**कोण कधी काय करील याचा कधीच अंदाज येत नाही. बोलणं वेगळं आणि करणी वेगळी अशी भुमिका बऱ्याच वेळा अनेकजण घेत असतात. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे सध्या लोकसभा निवडणुकीपासून दोन हात दुर असले तरी ते समाज माध्यमासह विविध कार्यक्रमात त्यांचा वावर दिसून येत आहे. बहुतेक साडेचार वर्षानंतर क्षीरसागर एका हॉटेलमध्ये जावून चहा घेतात, म्हणजे त्यात काही तरी दडलं असल्याची सध्या चर्चा आहे. जयदत्त अण्णांच्या चाय पे चर्चा ही लोकसभा निवडणुकीच्या भर मौसमात असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.**



बीड लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्यात ही लढत होणार आहे. सध्या निवडणुकीला ओबीसी विरूध्द मराठा समाज असा सामाजिक रंग आला आहे. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार असल्याचे दिसते. त्यातच काही दिग्गज नेते निवडणुकीपासून दोन हात दुर आहेत. त्यांनी उमेदवाराच्या प्रचारार्थ व्यासपीठावर न जाता विविध कार्यक्रमानिमित्त समाजात सलग्न राहणेच पसंत केले आहे. माजी मंत्री व ओबीसी नेते जयदत्त क्षीरसागर हे बीड विधानसभा निवडणूकीत पराभूत झाल्यावर राजकारणात सक्रीय नव्हते. साडेचार वर्षानंतर लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने का होईना आपण सक्रीय असल्याचे दाखवण्यासाठी ते सध्या कधी चाय पे चर्चा तर कधी गावागावातील लोकांच्या भेटीगाठी घेत आहेत. एखाद्या हॉटेलमध्ये जावून चहा पिणे तसे सामान्यांसाठी वेगळे असे काही नाही, मात्री एका माजी मंत्र्याने साडेचार वर्षानंतर ऐन निवडणुकीत ◀◀ पान २ वर

### जे पंकजाताईने केले तेच अण्णांनी केले!

परळीमधून बंधू धनंजय मुंडे यांनी पंकजाताई मुंडे यांचा पराभव केल्यानंतर त्या साडेचार वर्ष राजकारणापासून अलिप्त होत्या. त्यावर बरीच चर्चा, टिकाही झाली. दुसरीकडे बीडमध्ये पुतणे संदिप क्षीरसागर यांनी काका जयदत्त क्षीरसागर यांना पराभूत केल्यावर तेही सक्रीय राजकारणापासून दोन हात दुर राहिले. साडेचार वर्षानंतर लोकसभा निवडणुकीत आपले राजकीय बळ दाखवण्यासाठी ते सध्या सक्रीय झाले आहेत. कोणत्याच उमेदवाराला त्यांनी पाठींबा दिला नसला तरी पंकजाताई यांना जी अडचण सध्या येत आहे, ती जयदत्त क्षीरसागर यांना विधानसभेला येणार असल्याचे बोलले जाते.

अग्रलेख

# शेती विषयांची केवळ टोलवाटोलवी...

कांद्यावर लादण्यात आलेल्या निर्यातबंदीने सरकारला ऐन निवडणुकीत शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागते आहे. त्यामुळे भाजप व मित्रपक्षांच्या उमेदवारांची पळता भुई थोडी होत आहे. त्यातच गुजरातच्या पांढऱ्या कांद्यास निर्यातीची मंजुरी दिली जाते आणि कांदा उत्पादकांच्या जखमेवर अक्षरश: मीठ चोळले जाते. साहजिकच राज्यातील शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक होतोय. विरोधकही गुजरातला झुकते माप दिल्याचे भांडवल करून भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू करतात आणि साहजिकच ऐन निवडणुकीत वातावरण तापते. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यावर मग राज्यातील नेत्यांची युद्धपातळीवर धावाधाव सुरू होते आणि मग भांबावलेल्या स्थितीत सहा देशांमध्ये एक लाख टन कांदा निर्यातीस परवानगी दिल्याचे पत्रक सरकार काढते मात्र, प्रत्यक्षात निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने सरकारने नव्याने कांदा निर्यातीस परवानगी दिलेलीच नसते तर मित्र देशांना पाठवायच्या जुन्याच कांद्याचा तो एकत्रित आकडा असतो जो नव्याने प्रसिद्ध करून शेतकऱ्यांना संभ्रमात टाकून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न झालेला असतो मात्र, सत्ताधारी घटक या पत्रकाचा सोयीस्कर अर्थ लावून निर्यातबंदी उठवल्याचे ढोल बडवायला सुरुवात करतात आणि त्यामुळेच माध्यमांमध्येही कांदा निर्यातबंदी उठवल्याचे व सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिल्याचे मथळे येतात. प्रत्यक्षात या सरकारी पत्रकाची शहानिशा केल्यावर असे लक्षात येते की, जुनाच निर्णय पुन्हा नव्याने सांगून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी ही निव्वळ बनवाबनवी आहे.

सत्ताधारी भाजपच्या जुमलेबाजीच्या गुणाचा हा ढळढळीत पुरावा त्यामुळे साहजिकच शेतकऱ्यांची घोर निराशा झाली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये कांदा निर्यातीवर घालण्यात आलेल्या तिसऱ्या निर्यातबंदीची मुदत मार्च महिन्यात तिला अनिश्चित काळासाठी वाढविण्यात आली. त्यावरून संतापलेल्या शेतकऱ्यांनी कांद्याची खरेदी-विक्रीच बंद पाडल्यावर शेतकऱ्यांचा संताप कमी करण्यासाठी मार्चअखेरीस पाच लाख टन कांदा खरेदी करण्याची घोषणा सरकारने केली होती व त्या वेळीही सत्ताधाऱ्यांनी सरकाने कांदा उत्पादकांचे हित जपल्याचे ढोल जोरजोरात बडवले होते मात्र तेव्हापासून आजवर प्रत्यक्षात काही हजार टनांची कांदा खरेदी झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. थोडक्यात सरकार कांदा उत्पादक असो की शेतकरी त्यांना प्रत्यक्ष दिलासा देण्याऐवजी त्यांची फसवणूक करण्याचाच प्रयत्न करताना दिसते आहे. ही जुमलेबाजी का? शेतकरी या देशाचे मतदार नाहीत का? असे प्रश्न या घटनाक्रमातून निर्माण होतात. त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यावर हे लक्षात येते की, सरकारमध्ये बसलेल्यांना सगळे कळते; पण वळत नाही. कारण सत्ताकारणाच्या राजकारणात शहरी मध्यमवर्गीयांच्या एकगठ्ठा मतपेढीची सरकारला जास्त चिंता आहे. ती असण्याला आक्षेपही नाही कारण देशातल्या सर्वच नागरिकांना रास्त दरात सर्व धान्य, डाळी, तेल, भाज्या आदी जीवनावश्यक बाबी मिळाल्या पाहिजेत. महागाईवर नियंत्रण ठेवले गेले पाहिजे यासाठी प्रयत्न करणे सरकारचे कर्तव्यच. मात्र, हे कर्तव्य पार पाडताना उत्पादकांच्या पोटावर पाय देणे वा त्यांचा खिसा कापणे याला सरकारची न्यायबुद्धी म्हणायचे का? मात्र, हे सरकार सत्तेवर आल्यापासून शेतमाल, भाजीपाला, टोमॅटो, कांदा वगैरेच्या बाबतीत असो की साखर निर्यात, इथेनॉल निर्मितीबाबत असो धोरणांमध्ये सातत्याने धरसोडच पहायला मिळते आहे. कांद्याच्या दराच्या धसक्यातून तर भाजप अद्याप सावरलेलाच दिसत नाही त्यामुळे मोदी सरकार एकीकडे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा करते मात्र प्रत्यक्षात निर्यातबंदीचे अस्त्र सतत परजत ठेवते, असाच अनुभव देशातील शेतकऱ्यांना मागच्या पाच वर्षांमध्ये सातत्याने आला आहे. त्यात सर्वांत जास्त फटका अर्थात कांदा उत्पादकांना बसला आहे. सरकारने मागच्या पाच वर्षात कांद्यावर तिनदा निर्यातबंदी घातली, दोनदा किमान निर्यातमूल्य वाढवून निर्यात मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. एकदा निर्यातीवर शुल्क आकारणी केली आणि अशा विविध प्रयत्नांमधून कांद्याचे दर कुंपणातच रोखण्याचा यशस्वी फंडा पार पाडला. पाच वर्षांमध्ये कांद्यावर घालण्यात आलेली पहिली निर्यातबंदी साडेपाच महिन्यांची, दुसरी साडेतीन महिन्यांची होती. आता तिसऱ्या निर्यातबंदीच्या मार्च महिन्यात संपलेल्या तीन महिन्यांच्या मुदतीला लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन अनिश्चित मुदतवाढ देण्यात आली आहे.

कांदा उत्पादकांचा वा शेतकऱ्यांचा रोष वाढला की, हे सरकार शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून सरकारतर्फे खरेदीची घोषणा करते. प्रत्यक्षात किती खरेदी होते व शेतकऱ्यांना किती दिलासा मिळतो हा संशोधनाचाच विषय. त्यातही सरकारतर्फे खरेदी करणाऱ्या नाफेड असो वा अन्य सरकारी यंत्रणांनी थेट शेतकऱ्यांकडून खरेदी केली तरच त्याचा लाभ शेतकऱ्यांच्या पदरात पडतो मात्र, तेही होताना दिसत नाही. उलट अशा खरेदीत व्यापारीच उखळ पांढरे करून घेताना दिसतात. सरकारने जाहीर केलेल्या उद्दिष्टानुसार खरेदी केली जाते का? याची कधी पारदर्शक तपासणी होत नाही की अशा खरेदीचे आकडे कधी पारदर्शकपणे जाहीर केले जात नाहीत. शेतमाल निर्यातीबाबतच्या धोरणात सातत्याने होत असलेल्या या धरसोडीमुळे देशांतर्गत पुरवठा साखळीत विस्कळीतपणा येतो. त्याचा लाभ व्यापारी उचलतात. म्हणजे ज्या सामान्यांसाठी सरकार ही निर्यातबंदी वगैरे लागू करते त्या सामान्याला चढ्या दरानेच कांदा वा टोमॅटो किंवा इतर अन्नधान्य खरेदी करावे लागते शिवाय धरसोडीच्या या धोरणामुळे आपण परदेशातील आपली हक्काची बाजारपेठही गमावत आहोत मात्र, सरकार याचा साकल्याने विचार करताना अजिबात दिसत नाही.

## पीएम मोदींची नंदुरबार येथे १० मे रोजी जाहीर सभा

नंदुरबार । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नंदुरबार दौरा निश्चित झाला आहे. नंदुरबार लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. हिना विजयकुमार गावित यांच्या प्रचारार्थ (दि.७) मोदी यांची भव्य जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने डॉ. हिना विजयकुमार गावित यांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आ. चंद्रशखेर बावनकुळे हे (दि.२) नंदुरबार जिल्ह्यात आले होते, त्यांच्या उपस्थितीत नंदुरबार लोकसभेतील प्रमुख पदाधिकाऱ्यांची कामकाजाची बैठक पार पडली. त्यानंतर उपस्थित माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही नंदुरबार येथील चौथी जाहीर सभा असेल. तर भाजपाचे उमेदवार डॉ. हिना गावित यांच्यासाठी होणारी ही त्यांची तिसरी जाहीर सभा असेल.

## महाराष्ट्रात ७ ते ११ मे दरम्यान वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

### पंजाबराव डख यांचा अंदाज

मुंबई । पतिनिधी

**महाराष्ट्रात ७ ते ११ मे दरम्यान मुसळधार अवकाळी पावसाचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे. राज्यात सध्या कुठे ऊन, तर कुठे पाऊस अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची हजेरी लागत आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये उन्हाचा तडाखा वाढला आहे. हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी येत्या आठवड्यात हवामान कसे असेल याचा अंदाज वर्तवला आहे.**

राज्यामध्ये ६ मेपर्यंत हवामान कोरडे राहणार असून, राज्यात तापमानाचा पारा वाढताच राहणार आहे. त्यानंतर ७ मे ते ११ मे दरम्यान राज्यात पावसाची शक्यता आहे. वादळी वाऱ्यासह, विजेच्या गडगडाटासह अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे, तर काही ठिकाणी गारपीट होणार असल्याचाही अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे. पूर्व विदर्भात ७ ते ११ मे दरम्यान, विजांचा गडगडाटासह वादळी पाऊस पाहायला मिळणार आहे. मराठवाड्यातही ७ मेपासून पुढील पाच दिवस जोरदार अवकाळी पावसाची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांनी ६ मेपर्यंत कांदा, कापूस, हळद पिकांची काढणी करुन ते नीट झाकून ठेवा, असा सावधगिरीचा इशारा पंजाबराव डख यांनी दिला आहे. पश्चिम महाराष्ट्रातही हे पाच दिवस वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, हा पाऊस ऊसाच्या पिकासाठी फायदेशीर असणार आहे. यासोबतच कोकणातही ७ मेपासून पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आतापर्यंत उन्हाळ्यात झालेल्या पावसापेक्षा ७ ते ११ मे दरम्यान जोरदार अवकाळी पाऊस होण्याचा अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

## न रहेगा बांस, न बजेगी बांसुरी म्हणजे सरकारी नोकऱ्या नाहीत, आरक्षण नाही-राहूल गांधी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार निशाणा साधला आहे. त्यांनी आरक्षणाच्या मुद्यावर हल्लाबोल केला. राहुल गांधी म्हणाले की, नरेंद्र मोदींच्या आरक्षण हटाओ मोहिमेचा मंत्र आहे न रहेगा बांस, न बजेगी बांसुरी, म्हणजे सरकारी नोकऱ्या नाहीत, आरक्षण नाही. भाजपा सरकार खासगीकरण करून सरकारी नोकऱ्या काढून दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांचे आरक्षण छुप्या पद्धतीने हिसकावून घेत आहे, असे ते म्हणाले.**

राहुल गांधी यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केले आहे. सन २०१३ मध्ये पब्लिक सेक्टरमध्ये १४ लाख कायमस्वरूपी पदे होती, त्यापैकी २०२३ पर्यंत केवळ ८.४ लाख पदे उरली आहेत. बीएसएनएल, सेल, भेल यांसारख्या आघाडीच्या सार्वजनिक उपक्रमांना उद्ध्वस्त करून फक्त पब्लिक सेक्टरमधील जवळपास ६ लाख कायमस्वरूपी नोकऱ्या नष्ट झाल्या आहेत. ही एकमेव पदे आहेत जिथे आरक्षणाचा लाभ मिळतो. सरकारी कामे कंत्राटावर देऊन रेल्वेसारख्या संस्थेत मागच्या दाराने संपवल्या जाणाऱ्या नोकऱ्यांची गणती नाही. मोदी मॉडेलचे खासगीकरण म्हणजे देशाच्या संसाधनांची लूट होत असून, त्याद्वारे वंचितांचे आरक्षण हिसकावले जात असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे.

## पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मताचा पाऊस बजरंग बप्पा सोनवणेवर पडणार - गणेश कवडे

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकरी इंडिया महाविकास आघाडीच्या बाजूने मत करणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकार द्वारे सांगितले. भाजप सरकारच्या काळामध्ये शेतकरी आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे खचला आहे खताचे भाव गगनाला पोहोचले परंतु मालाचे भाव कमी करून शेतकऱ्यावर एक प्रकारे अन्याय केला कांदा या पिकाला निर्यात बंदी केली, सोयाबीनचे भाव वाढू नयेत याची प्रमाणिक काळजी घेतली, डिझेल ६० रुपयावरून १०० वर नेले याचा परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक नियोजनावर झाला. नांगरट १२०० वरून २००० भाव झाला शेतात पाळी



घालण्यासाठी ४०० रुपये एकरी वरून १००० रुपयांवर गेली, पेरणी ७०० वरून १५०० वर गेली, महिलांसाठी गॅस टाकीची योजना आणून प्रत्येक घरामध्ये गॅस टाकी दिली आणि त्याचा भाव ४०० वरून ११०० नेला, दैनंदिन जीवनामध्ये जीवनावश्यक लागणाऱ्या वस्तूवर जीएसटी बसवली, सोन्याचा भाव ४०००० वरून ७८००० वर गेला शेतकऱ्यांना मुला बाळांच्या लग्नामध्ये सोनं घेणं अशक्य झालं हे सरकार शेतकऱ्याच्या बाजूच नसून भांडवलदार लोकांच आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी निर्णय घेतला इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर मताचा पाऊस पडणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी सांगितले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रोत –डॉ.हनुमंत सौदागर

केज । पतिनिधी

**जगात जिथे –जिथे अन्याय अत्याचार होतात तिथे तिथे त्या शोषित वंचित लोकांचं लढाईचं बळ आणि प्रेरणा डॉ बाबासाहेब आंबेडकर होत जातात असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते कळंबआंबा येथील भिम जन्मोत्सव कार्यक्रमात व्याख्याते म्हणून बोलत होते.**




कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच शशिकांत इंगळे,प्रा.डॉ बाबासाहेब हिरवे,इब्राहीम चाचा पठाण, उपसरपंच डिगांबर वाघमारे, रिपाई चे तालुकाध्यक्ष सुनिल हिरवे माजी सरपंच सतिश इंगळे,राजकुमार मुसळे विलास लोढे आदींची उपस्थिती होती. उपस्थितांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शासकीय सेवेत रुजू होत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. डॉ बाबासाहेबांच्या जीवनावर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना डॉ सौदागर म्हणाले डॉ बाबासाहेबांचे विचार आत्मसात करून समाजाची उन्नती होईल. शेतकरी ,उपेक्षित,वंचित,महिला सर्व घटकांसाठी केलेले कार्य त्याचे पैलू समजून घेतले पाहिजेत.विचारधन ही देणगी आहे. जयंती महोत्सवातून उद्याची पिढी चांगली घडली पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रा डॉ हिरवे यांनी यावेळी विचार मांडले. विलास लोंढे यांनी उर्जादायी विचार मांडले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष दुर्योधन हिरवे,उपाध्यक्ष धम्मानंद हिरवे,सचिव बालासाहेब घाडगे,रजनीश गायकवाड,सुंदर घाडगे,इंद्रजित घाडगे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज हिरवे यांनी केले तर आभार हिरवे यांनी मानले.

पान १वरून...

### लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात

आणि मोठे वक्तव्य केले आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुक झाल्यावर महाराष्ट्रात राजकीय भुकंप तर होणार नाही ना? असा प्रश्न आता सर्वसामान्यांना पडला आहे. यावेळी पुढे बोलताना मोदी म्हणाले, ''दोन गोष्टी आहेत. उद्धव ठाकरे हे बायोलॉजिकली बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव आहेत. तो माझा विषयच नाही. ते आजारी होते. तेव्हा मी त्यांना फोन केला होता. मी वहिनीला रोज फोन करून विचारायचो. ऑपरेशन पूर्वी त्यांनी मला फोन केला होता. म्हणाले, भाईसाब काय सल्ला आहे? मी म्हटले, तुम्ही ऑपरेशन करा. बाकी चिंता सोडा. आधी शरीराकडे लक्ष द्या. बाळासाहेबांचा मुलगा म्हणून मी त्यांचा मान सन्मान करणारच. ते माझं शत्रू नाहीत. उद्या संकट आले तर त्यांना मदत करणारा मी पहिला व्यक्ती असेल. एक कुटुंब म्हणून. पण बाळासाहेबांचे विचार आहे. त्यासाठी मी जगेल'', अशी भावनिक प्रतिक्रिया नरेंद्र मोदी यांनी दिली. त्यामुळे लोकसभा निवडणुक झाल्यावर महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भुकंप तर होणार नाही ना? असा प्रश्न सर्वसामान्य नागरीकांना पडला आहे.

----------

### अमोल तरटे, अण्णासाहेब चौधरींच्या

यांनी आपापल्या पक्षाला सोडचिठ्ठी देत शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व स्वीकारून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे आष्टी व बीड जिल्ह्यात शरद पवार ताकद वाढली असून भाजप आणि अजित पवार गटाला खिंडार पडले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे आष्टी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ गडाच्या दर्शनाला जात असताना त्यांनी सावरगाव येथे अमोलराजे तरटे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के यांचा पक्ष प्रवेश केल्याबद्दल सत्कार केला. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, पक्षाचे विधानसभा अध्यक्ष राम खाडे, उद्धव दरेकर, डॉ. महेश नाथ, राम काका यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

**शरदचंद्र पवारांचे विचार तळागाळापर्यंत पोहचवू**

आम्ही जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांचे विचार वाड्या, वस्त्या, तांड्यापर्यंत पोहचवून शेतकऱ्यांचे जाणते राजे शरदचंद्र पवार यांचे हात बळकट करू व गद्धारांना त्यांची जागा दाखवून देऊ. लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांना मते मिळवून देण्यासाठी जीवाचे रान करू असा विश्वास अमोल राजे तरटे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के यांनी दिला.

----------

### मुस्लिम बांधवांना विकास आणि संरक्षण

माझे ध्येय आहे म्हणून या निवडणूकीत सन्मानाचा विजय मिळवून देण्यासाठी भरघोस मतांनी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करा. मी मंत्री असताना केलेला विकास तुम्ही प्रत्यक्ष डोळ्याने पाहिला आहे. माझ्याविषयी कुणाच्या मनात राग लोभ नाही. भविष्याचा विचार करा मला पाच वर्षे द्या. रोजगार, उद्योगासह पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबध्द राहील. सर्वांचा समान विकास करेन. देशात पुन्हा एकदा मोदी सरकार विराजमान होणार आहे. अशावेळी या भव्य विजयात आपलाही हिस्सा असावा यासाठी मला संधी द्या. मी कायम विकासासोबत आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे. अल्पसंख्याकांवर अन्याय होत असेल तर मी तुमच्या हक्कासाठी अगोदर पुढे येईल.मी मायनॉरिटी आहे पण काम मेजॉरिटीचे करते असं त्या म्हणाल्या.

**विकासासाठी पंकजाताईंना साथ द्या – आ.सोळंके**

प्रारंभी आ.प्रकाश सोळंके यांचे भाषण झाले. सत्तेत असताना पंकजाताईनी सर्व गावांना, सर्व जाती-धर्माला विकासाची समान संधी दिली. भेदभाव न करता सर्वांना निधी दिला. बीडचं भविष्य उज्वल करण्यासाठी पंकजाताईंना निवडून देणं गरजेचं आहे असं ते म्हणाले.

**पंकजाताईंच्या विजयासाठी हाडाची काडं करू – पोटभरे**

बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबूराव पोटभरे म्हणाले, पंकजाताई मुंडेंकडे विकासाचे व्हिजन आहे. त्या लोकनेते मुंडे साहेबांच्या राजकीय वारसदार आहेत म्हणून आम्ही त्यांच्यासोबत आहोत. त्यांच्या विजयासाठी हाडाचे काड करून त्यांना विक्रमी मताधिक्य मिळवून देऊ.

**तेलगाव येथे भेटीगाठी**

पंकजाताई मुंडे यांनी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड, तेलगाव येथे मतदारांशी प्रत्यक्ष भेट घेऊन संवाद साधला. या ठिकाणी पंकजाताईंच्या आगमनानिमित्त ग्रामस्थांनी त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करत खंबीरपणे पाठीशी राहू असा शब्द दिला.

-------------

### गोदावरीचे पाणी सिंदफणेत

देखील तुमच्याच भगिनी खासदार होत्या. मग त्या भाजप सोबत एकनिष्ठ नव्हत्या की काय? म्हणून तुम्ही पंतप्रधानाच्या नजिक गेल्यास विविध योजना आणण्यासाठी मतदान मागत आहात. असे कोपरखळी मारली. आज भाजपच मतासाठी जातीवाद करीत आहे. परंतु खुल्या प्रवर्गानेच मागील पंधरा वर्षा पासून जिल्ह्याचा खासदार म्हणून ओबीसी प्रवर्गाला संधी दिली. तसेच बजरंग बप्पा यांचे कुणबी जातीचे काढलेले प्रमाणपत्र पालक मंत्र्यांनी भर सभेत फडकावून दाखविण्याची आवश्यकता नव्हती. कारण ते सर्व कुणबी मराठा जात प्रमाणपत्र हे ऑनलाईन असल्याने सर्वांना पाहण्यासाठी खुले आहे. राज्याचे कृषिमंत्री म्हणून पालकमंत्री काय काम केलं ? याची माहिती त्यांनी द्यायला हवी. कांदा अनुदान, सन २०२० चा पीकविमा, कापूस, सोयाबीन, तूर व हरबरा या पिकांना भाव नाही. मात्र खासदारांनी संसदेत या बाबत कधीच तोंड उघडले नाही. त्यांना कुणीच संसदेत बोलताना नव्हे तर निवडणुकीत मते मागण्यासाठी आणि जिंकल्या नंतरही कोणत्या गावात गेल्याचे कुणी पाहिलेले नाही. भाजपच्या उमेदवार आणि पालकमंत्री यांचे जलजीवन मिशन आणि रस्त्याच्या काम करणारे ठेकेदार यांच्याशी अर्थपूर्ण सबंध असल्यानेच त्या योजने संबंधी बोलत नाहीत की काय? असा प्रश्न उपस्थित केला. तसेच बहुरंगी म्हणणाऱ्या पालक मंत्र्यांना उत्तर देताना कुणाचा बहुरंगीपना उभ्या महाराष्ट्राला ठाऊक आहे. असे म्हणून मी रंगात रंग मिसळणार बजरंग आहे. असे म्हणाले. तसेच पालकमंत्री महोदय हे अशा प्रकारचे वक्तव्य करून ते स्वतःच त्यांच्या उमेदवाराला पराभूत करण्याची त्यांनाच घाई झालेली आहे. असे म्हणाले. तर मी निवडून आल्यास मराठा, धनगर, मुस्लिम ओबीसी यांचे आरक्षणासाठी मर्यादा वाढविणे. सुशिक्षित बेकारांच्या हाताला काम देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात नवीन प्रकल्प आणून बेकारी दूर करून दरडोई उत्पन्न वाढविणे. संविधान वाचविण्यासाठी प्रयत्न करणे याचाही उल्लेख भाषणात केला. तसेच मतदारांच्या. प्रेमामुळे बजरंग सोनवणे भारावून गेले आणि म्हणाले की, तुमचे प्रेम बघून कातड्याचे जोडे केले. तरी मी त्यातून उतराई होवू शकणार नाही. असे भावनिक उदगार काढले. यावेळी राज्य प्रवक्त्या प्रा. शुशिलाताई मोराले, माजीमंत्री लोकनेते बदामराव आबा पंडित आणि माजी सभापती पंढरीनाथ लगड यांची भाषणे झाली. या कॉर्नर सभेला मादळमोही आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------

### सेक्स स्कॅंडल आरोपी प्रज्वल रेवन्ना

कडक कारवाई केली पाहिजे, अशी मागणी अखिल भारतीय काँग्रेस कमिटी मीडिया विभागाच्या महाराष्ट्र समन्वयक प्रगती अहिर यांनी केली.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसच्या प्रगती अहिर म्हणाल्या की, प्रज्वल रेवन्ना याच्या सेक्स स्कॅंडलची माहिती भारतीय जनता पक्षाला होती, असे असतानाही भाजपाने जेडीएसबरोबर कर्नाटकात युती केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रज्वल रेवन्नाचा प्रचारही केला. रेवन्नाला मत म्हणजे मोदीला मत असे मोदी म्हणाले. हजारो महिलांवर अत्याचार करणारा प्रज्वल्ल रेवन्ना मोदी-शाह यांच्या नाकाखालून परदेशात पळाला कसा. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वैयक्तीक कामासाठी किंवा उपचारासाठी परदेशात गेल्याची माहिती नरेंद्र मोदी व अमित शाह यांना असते पण रेवन्ना पदेशात पळून गेला याची माहिती कशी मिळाली नाही. कर्नाटकातील हजारो महिलांवर लैंगिक अत्याचार केले हा नारीशक्तीचा, मातृशक्तीचा अपमान नाही का. नारीशक्ती, मातृशक्ती या भाजपाच्या पोकळ घोषणा आहेत. मागील १० वर्षांच्या भाजपा राजवटीत देशभरात लाखो महिलांवर अत्याचार झाले, भाजपा खासदार ब्रिजभूषणसिंह याने महिला खेळाडूंवर अत्याचार केले पण त्याचावरही कारवाई केली नाही. मणिपूरमध्ये महिलांवर अत्याचार झाले त्यावर भाजपा व नरेंद्र मोदी काहीही बोलले नाहीत. भाजपा राजवटीत महिला सुरक्षित नाहीत, असेही प्रगती अहिर म्हणाल्या. या पत्रकार परिषदेला माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस इंडिया आघाडीचे उमेदवार भूषण पाटील, राकेश शेट्टी आदी उपस्थित होते.

--------------

### जयदत्त अण्णांची चाय पे चर्चा; हॉटेलात

चाय पे चर्चा करणे म्हणजे त्यात काही तरी दडलं असल्याचे म्हटले जात आहे. समाज माध्यमातही त्यांच्या समर्थकांच्या माध्यमातून ते पुर्णत: सक्रीय असल्याचे दिसते. एकीकडे आपली राजकीय भुमिका जाहीर न करणे तर दुसरीकडे लग्न, उद्घाटने, भेटीगाठी, अखंड हरिनाम सप्ताह अशा कार्यक्रमातून आपला वावर आणि राजकीय बळ दाखवण्याचा क्षीरसागर यांचा प्रयत्न असल्याचे म्हटले जात आहे. समाजातील वावर आणि बंदमुठीत असलेल्या राजकीय भुमिकेचा लोकसभा निवडणुकीत नेमका काय परिणाम होतो? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

----------

### बापुराव धोंडे यांचे निधन

२ वा.हृदयविकाराने निधन झाले.माजी आ.भीमराव धोंडे यांचे लहाण भाऊ म्हणुन बापुराव धोंडे यांच्यावर अतिशय प्रेम होते. बापुराव धोंडे काका यांना राजकारणातील अनेक पदे धोंडे साहेबांनी दिले होते.एक शांत,संयमी आणि प्रचंड बंधुप्रेम जपणारा भाऊ अशी बापुकाकांची प्रतिमा जिल्हाभर होती.राजकीय,सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर बापुकाकांची मस्करी करीत असत परंतु त्याचा कधीही राग लोभ न धरात थट्टेथटेतच हजर जबाबी उत्तर ते देत असत. आ.सुरेश धस यांचे मोठे बंधु देविदासआबा धस,माजी आ. साहेबराव दरेकर यांचे कनिष्ठ चिरंजीव उध्दवबापु दरेकर,विजय गोल्हार, सतीषमामा झगडे हे बरोबरच बीड जि.प.सभागृहात सदस्य असल्याने यांच्यातील थट्टा,विनोद ,मस्करी अनेकदा तालुक्याला पाहायला मिळली होती. निर्मळ मनाचा,मैत्री जपणारा,निगर्वी मोठ्या मनाचा माणुस म्हणुन बापुराव धोंडे यांची जिल्हाभर ओळख होती. शेतकरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमनपद सांभाळताना संस्थेतील हजारो कर्मचाऱ्यांना तात्काळ मदत करणारे चेअरमन अशी प्रतिमा त्यांनी निर्माण केलेली होती.त्यांच्यापाठीमागे माजी आ.भीमराव धोंडे,कडा कृ.उ.बा. समितीचे उपसभापती नामदेव धोंडे ,राजेंद्र धोंडे आणि ज्ञानदेव धोंडे हे चार भाऊ,पाच बहिणी,एक मुलगा,एक मुलगी,पत्नी असा मोठा परिवार आहे.जन्मगाव रुईनालकोल येथील वैंकुठधामात अंत्यविधी करण्यात आला.यावेळी राजकीय,सामाजिक,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

### सहा हजार कोटी पंतप्रधान

पंतप्रधानाचे कार्यालय हे मानवतेचे कार्यालय आणि लोकांना न्याय देणारे भीतीमुक्त कार्यालय असा कारभार मी पाहत आलो आहे. मागच्या १० वर्षांत मानवतेचा कार्यकाळ राहिला नसल्याची खंत या वेळी व्यक्त केली. पुढे बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून दोघांना भिडवण्याचे षडयंत्र येथे झाले. पण वंचित बहुजन आघाडीने शांततेची भूमिका घेतल्याने सलोखा कायम राहिला आहे. इथे एकही वर्ग नाही जो म्हणेल तो सुखाने आणि शांतीने राहत आहे. दिल्लीत आंदोलन करणारे शेतकरी काय म्हणत होते. दर जूनमध्ये हमीभाव जाहीर करता पण हमीभाव शेतकऱ्यांना मिळत नाही. म्हणून ते शेतकरी लाखोंच्या संख्येने हिवाळा, पावसाळा आणि उन्हाळ्यामध्ये दिल्लीत आंदोलनाला बसले होते. प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, तुम्हाला तुमचे स्वातंत्र्य अबाधित ठेवायचे असेल, तर मतदान द्या आणि स्वातंत्र्य गमवायचे असेल, तर भाजपला मतदान द्या असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. भाजपा तुम्हाला गुलाम करत आहे, लोकशाही संपवून त्यांना हुकूमशाही आणायची आहे. त्यासाठी पहिल्यांदा तुमचा मेंदू त्यांच्या ताब्यात आहे का? हे तपासण्याचे काम चालू आहे. त्यांना सत्तेतून खाली खेचले पाहिजे. इथे वसुलीचे राज्य सुरू झाले आहे इथे कल्याणकारी राज्य पाहिजे होते, ते न राहता लोकांना त्रास देणारे वसुलीचे राज्य सुरू असल्याची टीकाही प्रकाश आंबेडकर यांनी केली.

----------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. ३ मे २०२४



## पीव्हीपी कॉलेज ऑफ फार्मसी, पाटोदा येथे महाराष्ट्र दिन उत्सहात साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसी येथे महाराष्ट्र दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला महाराष्ट्र दिन देशभरात मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो आहे. त्याचप्रमाणे पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसी, पाटोदा येथे देखील दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र दिन मोठ्या हर्ष उल्लासात साजरा करण्यात आला. या निमित्त प्रमुख पाहुणे सन्मानीय अतिथी वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी




पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसी, पाटोदा

चे प्राचार्य श्री.तांदळे एस. डी. यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच या प्रसंगी या कार्यक्रमानिमित्तप्राध्यापक वर्ग डी. प्रा. पठाण ए.के., प्रा. सयद टी.क्यू. प्रा.घुमरे व्ही.एस., प्रा.बहिर एस. एम, प्रा.बासद तहा, क्षीरसागर.के.आर.आणि सर्व शिक्षकोत्तर कर्मचारी जाधव एस. ए. ,सोळुंखे एन.आर., सरवदे ए.एस.,संकेत बहीर, किरण शेकडे, शिंदे व्ही.एस.,वाघ बी.ए., गाडे.एम.एस.यांच्या सहकार्याने उपस्थितीत महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम पार पडला.

# तीन वेळा झालेल्या अवकाळी पावसाचा फळबागांना फटका

## बागायतदार हवालदिल



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

यंदा आतापर्यंत तीन वेळा अवकाळी पावसासह गारपिटीचा फळबागांना फटका बसला असून, सर्वाधिक आंब्याचे नुकसान झाले. तसेच लिंबू, ज्वारीचेही नुकसान झाले. तालुक्यातील फळ बागायतदार हवालदिल झाला असून, तातडीने सर्वेक्षण करून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

आंबा उत्पादन समाधानकारक व्हावे, या हेतूने खते, कीटकनाशके यावर लाखो रुपये खर्च केले. मात्र तालुक्यामध्ये ९ ते १२ एप्रिल या दरम्यान काही ठिकाणी अवकाळी पावसासह गारपीटीने आंबा फळांचे नुकसान झाले. आधीच कर्जबाजारी असलेले आंबा बागायतदार हाता तोंडाशी आलेले आंबा पिक हिरावून गेले. नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन, शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याची मागणी होत आहे. दरम्यान नुकसान झालेल्या फळ बागेचा पंचनामा केला का ? हे विचारण्यासाठी तहसीलदार विलास तरंगे यांना संपर्क साधला असता नेहमी प्रमाणे त्यांनी फोन स्विकारला नसल्याने या बाबत माहिती कळू शकली नाही.

प्रतिकुल हवामानाचा परिणाम

गारांमुळे आंबे खराब होतात. त्यांना बुरशीचा प्रादुर्भाव होतो. गारपिटीच्या तीव्रतेवर फळगळ अवलंबून असते. पाऊस आणि प्रतिकूल हवामानाचा आंबा उत्पादनावर परिणाम होतो. गारांचा मार लागल्याने आंबे काळे पडतात. यामुळे तो खाण्यास योग्य नसतो.

अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे गावरान आंबा, ज्वारी, कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वातावरणातील बदलाचा फटका पिकांच्या उत्पादनावर होणार आहे. नुकसानीचे सर्वेक्षण करून मदत तात्काळ देण्यात यावी.

-बाळासाहेब उगले ( शेतकरी, पाटोदा म. )

## सपोअ कमलेश मीना यांची धडाकेबाज कारवाई

### ९,५८,००० रुपयांचे गोवंश जातीचे जनावरे कत्तलखान्यात जाण्यापासुन रोखले



केज । प्रतिनिधी

सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.कमलेश मीना, उपविभाग केज यांच्या पथकाने गोवंश जातीचे जनावरे कत्तल खाण्यात जाणाऱ्या वाहनावर कारवाई करत ९,५८,००० रूपये किंमतीचे गोवंश जातीच्या जनावरांसह वाहतुकीस वापरातील आयशर टँम्पो सह जप्त करुन तीन आरोपींच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी पहाटे तीन वाजण्या च्या सुमारास सहाय्यक पोलीस अधिक्षक,उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग केज यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की,एक आयशर टँम्पो क्रमांक एम.एच. ०४ ई.एन.३७३५ यामध्ये गोवंशजातीचे जनावरे भरुन ती कत्तलीसाठी बेकायदेशीररित्या केज येथुन अंबाजोगाईकडे अवैद्य वाहतुक करीत आहे.अशी माहिती मिळाल्यावरुन सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. कमलेश मीना यांच्या पथकातील दिलीप गित्ते, पोलीस नाईक विकास चोपने,अनिल मंदे,पोलीस ठाणे केज येथील चालक पोलिस हवालदार,पोलिस नाईक दराडे,पोलिस नाईक भंडाणे यांना सदर वाहन ताब्यात घेवुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेश दिल्याने वर नमुद पथकातील पोलीस अंमलदार यांनी पिसेगाव फाटा येथे थांबवुन पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारासवर वर नमुद वाहन ताब्यात घेतले,वाहनाचे चालक यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव जाकेर खाजाभाई खुरेशी,वय २२ वर्ष रा.विडा ता.केज जि.बीड असे सांगीतले तसेच सदर जनावरे कोणाच्या मालकीचे आहेत याबाबत विचारणा केली असता सदरचे, जनावरे हे दिलीप आश्रुबा घोरपडे,अप्पाराव दिलीप घोरपडे,दोन्ही रा.विडा ता. केज जि.बीड असे सांगीतले, पथकातील कर्मचारी यांनी सदरच्या वाहनाची पाहणी केली असता खिलार जातीचे बैल व एक जर्सी जातीचे बैल असे होते,सदर गोवंश जातीतील जनावर हे शेती कामाचे व्यापारासाठी घेवुन जात असल्याचे दिसावे म्हणुन सदर जनावराचे अंगावर गुलाल टाकल्याचे दिसुन आले.सदरचे चालक यास जनावरे कोठे घेवुन जात आहात ? याबाबत विचारणा केली असता सदरचे जनावरे हे नळेगाव येथील बाजारात घेवुन जात असल्याबाबत सांगीतले.त्यांना जनावराच्या दाखले,पावत्या कागदपत्रा विषयी विचारणा करता त्यांच्या कडे कागदपत्र मिळुन आले नाही.वरील वर्णनाचे अकरा खिलार जातीचे बैल व एक जर्सी जातीचे बैल गोवंश जातीचेजनावरे व आयशर सह एकूण ९,५८,००० रुपये किमतीचा माल जप्त केला.तरी यातील आरोपी क्रमांक ०१ ते ०३हे गोवंश जातीचे जनावरे क्रूरतेने निर्दयीपणे क्षमतेपेक्षा जास्त भरुन ते आयशर टँम्पोमध्ये भरुन ते व्यापाराची जनावरे आहेत असे दाखवण्यासाठी त्यांच्यावर गुलाल टाकुन त्यांची कत्तल करण्या साठी घेवुन जात असतांना मिळुन आल्याने वर नमुद आरोपी विरुध्द पोलीस नाईक दिलीप गित्ते यांचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही श्री. नंदकुमार ठाकुर,पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना एस.तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक,अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.कमलेश मीना,सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभाग केज यांच्या आदेशाने पोलीस नाईक दिलीप गित्ते,अनिल मंदे,विकास चोपने,पोलीस हवालदार दराडे,पोलीस नाईक भंडाणे यांच्या पथकाने केली आहे.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी

**केज । प्रतिनिधी**

दि.३० एप्रिल २०२४ मंगळवार रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेतराष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस त्यांच्या जयंती निमित्त या शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम व लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले व अभिवादन केले.त्यांचा जन्म दि.३० एप्रिल रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद येथे झाला असुन वडील बंडोपंत व आई मंजुळा असुन त्यांचे मुळ नाव माणिक बेंडोजी इंगळे असे होते. ते ब्रम्हभट वंशातले होते.त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन,जातीभेद निर्मूलनासाठी भजनातून, किर्तनातून जनप्रबोधन




केले. ग्रामगितेतून आत्मसंयमनाचे विचार मांडले.डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत ही पदवी दिली होती.असे आपल्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक श्री राजाभाऊ कदम यांनी सांगितले.केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. बापुसाहेब गायकवाड,बाळासाहेब राठोड, बाबासाहेब मैंद,श्रीमती गिताताई अंडील,श्रीमती सोनाली भुमकर,भारत हांगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती गिताताई अंडील यांनी केले व शेवटी श्रीमती सोनाली भुमकर मॅडम यांनी कार्यक्रमात उपस्थितांचे आभार मानले.

## नानासाहेब घोडके यांना स्व.सम्राट नाईक पुरस्कार जाहिर

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष चर्मकार समाजाती अग्रगन्य नेतृत्व नानासाहेब घोडके यांना अपेक्षा मासीक,पुणे परिवाराकडून दिला जाणारा स्व.सम्राट नाईक पुरस्कार जाहिर झाला आहे. नानासाहेब घोडके यांनी आता पर्यंत सामाजीक, राजकिय



क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे यात विशेष उल्लेखणीय अंद्धश्रद्धा निर्मुलन,दलित मुला,मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त करणे,अत्याचार ग्रस्त,पिडीतांना मदत करणे,रोगग्रस्त व निराधार व्यक्तिंना योग्य ती मदत करणे.न्याय हक्कांसाठी विविध प्रकारची आंदोलने चालुच ठेवुन सामाजिक चळवळ जीवंत ठेवली तसेच राजकिय क्षेत्रात माजलगाव तालुक्यातील खानापूरकर ग्रा.पं.च्या उपसरपंच पदी २०१८मध्ये बिनविरोध निवड झाली होती यातुन त्यांनी गावाच्या विकासा साठी योगदान दिले आहे. त्यांच्या उल्लेखित कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र सरकारच्या वतीने सामाजिक न्याय विभागाकडून दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार-२०२४ देऊन गौरविण्यात आले आहे. १०मे रोजी स्व.सम्राट नाईक यांच्या तृतीय पुण्यस्मरणा निमित्ताने पत्रकार भवन ,नवीपेठ पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळयात जेष्ठ साहित्यिका,उद्योजिका चंद्रलेखा बेलसरे व सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ सत्यशील नाईक यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

पान ६ वरून...

### बीड लोकसभा मतदारसंघातील

रिट याचिका दाखल केली होती.

संजय काशिनाथ काळे यांचे नामनिर्देशनपत्र अपूर्ण असल्यामुळे ते अवैध ठरविण्यात आले. याबाबत संजय काळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून नामनिर्देशपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली. सुनावणीअंती उच्च न्यायालयाने संजय काळे यांची याचिका खारिज केली आहे. त्याचप्रमाणे यशवंत उत्तरेश्वर गायके यांनी दाखल केलेले शपथपत्र अपूर्ण होते. सुधारित शपथपत्र दि. २६.०४.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत दाखल करणेबाबत त्यांना लेखी नोटीस देण्यात आली होती. त्यांनी सुधारित शपथपत्र दाखल केले परंतु, सुधारित शपथपत्रसुद्धा परिपूर्ण नसल्याने त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला होता. या निर्णयाविरूद्ध श्री गायके यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ही याचिकासुद्धा खारिज केली आहे.

३९-बीड लोकसभा मतदारसंघातील सर्व निवडणूक प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शकपणे पार पाडण्यात येत आहे. दि. १३ मे २०२४ रोजी होणा-या मतदान प्रक्रियेमध्ये सर्व मतदारांनी सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन, जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले आहे.

### प्रकाश आंबेडकरांची सभा

देत बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये रंगत निर्माण केली आहे. बीड जिल्ह्यात गरीब परिस्थिती मधून उभा राहिलेला नेतृत्वच बीड जिल्ह्याचा विकास करू शकतो म्हणून अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ आंबेजोगाई मोंढा मैदान या ठिकाणी प्रकाश आंबेडकर यांची ऐतिहासिक सभा होणार असून या क्षणाचे आपणही साक्षीदार व्हावे यासाठी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

मराठा, ओबीसी, मुस्लिम बांधवांनो मताचे विभाजन टाळा

महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे अजित पवार व धनंजय मुंढे यांचे जाहीर कार्यकर्ते आहेत. शिवसंग्रामच्या ज्योतीताई मेटे यांची दिशाभूल करत त्यांची उमेदवारी नाकारली व महाविकास आघाडीचे बजरंग बप्पा सोनवणे यांना उमेदवारी देत एक प्रकारे महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंढे यांना मदत करत मतविभाजन करत असल्याचे दिसून येत आहे ही वेळीच मतदारांनी लक्षात घेऊन मतदान करावे.

### अखेर बृजभूषण यांचा

कापण्यात आले. त्यामुळे भाजपविरोधात ठाकूर समाजात प्रचंड नाराजी आहे. या समाजाच्या नेत्यांनी महापंचायत घेऊन भाजपला विरोध दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर बृजभूषण शरण सिंह यांचे

## उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत फ्लाईंग बड्‌र्सचे १२ विद्यार्थी उत्तीर्ण

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने दरवर्षी इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांसाठी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते यावर्षी घेण्यात आलेल्या या शिष्यवृत्ती परीक्षेत शहरातील इंग्रजी माध्यमाची शाळा फ्लाईंग बड्र्स अकॅडमी मधील २० विद्यार्थ्यांनी या वर्षी ही परीक्षा दिली होती त्यातील १२ विद्यार्थी चांगले गुण घेऊन शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत,सलग दुसऱ्या वर्षी ही फ्लाईंग बड्र्स अकॅडमीने शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवले आहे.

फ्लाईंग बड्र्स मधील ५ वी इयत्तेत शिकणाऱ्या प्रशिक जाधव,अभिषेक शिंगाडे,अंशुमन लोखंडे,राजवीर झाटे,अंश घुगे, अर्णव भावसार, आदिश्री जैवल,




अवन्या जाधव, आर्वी बाहेती, संस्कृती घाडगे, प्राची ढोबळे, आशिष साळवे, इत्यादी १३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक,प्राचार्या सारिका बजाज सह सर्व संचालक मंडळाकडून अभिनंदन करण्यात आले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक,संचालक प्रभाकर शेटे,अली पटेल,इत्यादी उपस्थित होते.यावेळी लक्ष्मीकांत भावसार व अरुंधती जैवाल यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक स्पर्धा परीक्षा संबंधी विशेष मार्गदर्शन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांसाठी अंकिता तरकसबन व सचिन गायकवाड या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

## पतीकडे घेऊन जाण्याचा बहाना करून महिलेवर बलात्कार

**पीडित महिलेच्या फिर्यादीवरून दोन जणावर धारूर पोलिसात गुन्हा दाखल**

**धारूर । प्रतिनिधी**

पतीकडे घेऊन जातो म्हणून पीडितेवर आंबेजोगाई येथील एका लॉजवर ९ मार्च पासून तीन दिवस ओढणीने बांधून, तोंड दाबून बलात्कार केला .झालेला प्रकार कोणाला सांगितल्यास नवऱ्याला जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून धारूर पोलिसात ठाण्यात शौकतशहा शेरशहा व कलीमोद्दीन करीमोद्दीन काजी या दोन आरोपी विरोधात धमकी व बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे . अधिक तपास पोलीस करत आहेत.

पीडित महिला व तिचा पती आरोपींच्या शेतात दि. १ पासून शेतात मजुरी काम करत होते . दि ३ मार्च रोजी ९ वाजण्याच्या सुमारास पीडितेचा पती घरी नसताना आरोपी शौकत शहा याने पिढीचे सोबत बळजबरी केली . तेथून तिला संभाजीनगर झोपडपट्टी येथे आरोपीच्या आत्याच्या घरी नेऊन सोडले . तेथून पीडीतेचा नवरा आंबेजोगाई येथे आहे असा बहाना करून दोघा आरोपांनी पीडितेस आंबेजोगाई येथील शेतातील शेडमध्ये तीन दिवस ठेवले . त्यानंतर पुन्हा पतीकडे घेऊन जाण्याचा बहाणा करून आंबेजोगाई मध्ये एका लॉजवर तीन दिवस दोघा आरोपींनी पिढीतेवर हातपाय ओढणीने बांधून, तोंड दाबून बलात्कार केला . झालेला प्रकार कोणाला सांगितल्यास तुझ्या नवऱ्याला जीवे मारीन अशी धमकी दिली नतर चार चाकी वाहनाने धारूर येथे आणून सोडले . दि ९ मार्च रोजी पुन्हा पीडितेच्या घरी येऊन आरोपी एका आरोपीने झोंबाझोंबी केली . पीडितेस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपी शौकतशहा शेरशहा व कलीमोद्दीन करीमोद्दीन काजी यांच्या विरोधात दि २८ एप्रिल रोजी पीडितेच्या तक्रारीवरून धारुर पोलिसात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक श्री.शेळके व पिंक पथक केज करत आहेत

पान ६ वरून...

तिकीट कापताना भाजपपुढे मोठी अडचण निर्माण झाली होती.

ठाकूर समाजाची नाराजी दूर करण्यासाठी भाजपने बृजभूषण शरण सिंह यांचे तिकीट कापून त्यांच्या जागेवर कैसरगंज येथून त्यांचे पुत्र करण भूषण सिंह यांना उमेदवारी देण्याचा तोडगा काढला आहे. शुटिंगचे राष्ट्रीय खेळाडू असलेले करण भूषण सध्या उत्तरप्रदेश कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आहेत. वडिलांवरआरोप झाल्यानंतरही ते या पदावर निवडून आले होते. करणभूषण पहिल्यांदाच लोकसभा निवडणूक लढवणार आहेत.

### वोट देणार त्यासोबत

शिल्लक राहिलेली देणगी रुपये २१,०००/- अशोक हिंगे पाटील यांना निवडणूक देणगी म्हणून बहाल केली. यामुळे बीडची लोकसभा निवडणूक तिरंगी होणार हे निश्चित झाले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, युवा नेते अजय सरवदे, युवा तालुकाध्यक्ष अनिल कांबळे, जिल्हा सचिव अरुण बनसोडे, जिल्हा सचिव परमेश्वर लांडगे, शहराध्यक्ष अमोल हातागळे, जिल्हा उपाध्यक्ष अस्लम पठाण, प्रसिद्धी प्रमुख अविनाश घणघावं, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अजय वाघमारे, तालुका उपाध्यक्ष प्रदीप वाघमारे,तालुकाध्यक्ष खाजमिया पठाण, सरपंच प्रशांत गंगणे, उपसरपंच नीलकंठ गंगणे, बबरूवान बनसोडे, सदस्य उमेश गंगणे, नितीन वाघमारे, सिद्धार्थ बनसोडे, बाळासाहेब गंगणे

पान ६ वरून...

आदी उपस्थित होते.

### समनक जनता पार्टी लोकसभेचा

संपुर्ण ताकदीनिशी निवडणूक लढवत आहोत आम्हाला यवतमाळ-वाशीम येथे वंचित बहुजन आघाडीने देखील पाठिंबा दिला आहे आम्ही संविधान वाचवण्याकरिता आणि देशातील महागाई, शिक्षण, खाजगीकरण याला विरोध करण्याकरिता निवडणुक लढवत आहोत. तसेच नेहमीच पक्ष बदल करत असलेले रविकांत राठोड यांना आम्ही बीड येथे त्यांच्यावर विश्वास ठेवून उमेदवार दिली परंतू त्यांनी आमचा विश्वासघात केला आणि माध्यमांना देखील खोटी माहिती दिली की मी अपक्ष उभा होतो परंतू वास्तविकतः तसे नसता ते समनत जनता पार्टीकडून उभे राहिले होते त्यासाठी उपस्थित पत्रकारांना त्यांनी पुरावे म्हणून निवडणुक निर्णय अधिकारी यांचे स्वाक्षर्या असलेले कागदपत्र दिले. तसेच रविकांत राठोड यांच्यावर कार्यवाही करु आणि त्यांना ऐन निवडणुकीच्या वेळी आमच्यापासून ज्या पक्षाने केले त्या पक्षावर देखील आम्ही कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे यामुळे समनक जनता पार्टी पाठिंबा कोणाला देईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयांमध्ये सकाळी ०७:४५ वाजता बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला यावेळी उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे संचालक प्रभाकरराव होके, अमोलराव जाधव, जुगलकिशोर नावंदर,सचिव हरिभाऊ सवणे,माजी प.स.सदस्य मिलिंद लगाडे यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी बांधव उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
गुरूवार दि.३ मे २०२४



# वाढत्या उष्णतेचा पशुधनावर थेट परिणाम

## मुदतपूर्व प्रसूतीच्या घटनांत वाढ

पुणे : यंदा उन्हाचा पारा वाढता असल्याने सर्वच घटकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. उष्म्याने माणसाला हैराण केले आहेच पण, जनावरांवरही याचा परिणाम होताना दिसत आहे. गाभण गाय, म्हशीची मुदतपूर्व प्रसूती होण्याच्या घटना वाढलेल्या आहेत. शिवाय जनावरे दगावण्याचाही धोका वाढला आहे. त्यामुळे पशुपालकांनी काळजी घेणे आवश्यक बनले आहे.

शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे पाहिले जाते. अनेकांनी मुख्य व्यवसाय म्हणून याला पसंती दिली आहे. ग्रामीण भागात काही कुटुंबांचा अपवाद सोडला तर घरटी एक-दोन जनावरे आढळतातच. त्यांच्या दुधांच्या उत्पन्नावर बराचसा चरितार्थ चालवला जातो. महिनाभरापासून उष्णतेचा पारा वाढला आहे. ३८ ते ४० च्या घरात तो खेळत आहे. वाढलेल्या उष्म्याचा परिणाम माणसाबरोबरच जनावरांवरही होताना दिसत आहे. यावर पशुधन अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार वातावरणातील उष्मा वाढला की जनावराच्या शरीराचे अंतर्गत तापमान वाढते. त्यामुळे गाभण जनावरांची मुदतपूर्व प्रसूती होण्याचा धोका असतो. पशुपालकांनी गोठ्यातील



उष्णतेचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. बहुतांश पशुपालकांचा गोठा स्वतंत्र नसतो. घरातीलच एका खोलीत शक्यतो शेवटच्या खोलीत जनावरे बांधली जातात. त्यामुळे वारा खेळता राहत नाही. त्यातही वर पत्रे घातलेले असतील तर उष्णता अधिक वाढते. त्यामुळे गोठ्यातील वातावरण उष्ण राहत आहे. पूर्वीसारखे जनावरांना बाहेर सोडण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी, २४ तास जनावरे गोठ्यातच बांधून राहतात. या साऱ्याचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होत आहे. वाढलेल्या उष्म्यामुळे गाभण जनावरांची मुदतीपूर्वी प्रसूती होण्याचे प्रमाण वाढले आहे. यात वासरू, रेडकू दगावण्याची शक्यता अधिक असते. तसेच दुधावरही काही प्रमाणात परिणाम होतो. शिवाय उष्म्यामुळे जनावरे दगावण्याचाही धोका वाढला आहे. त्यामुळे पशुपालकांनी वाढत्या उष्म्याचा विचार करून जनावरांची काळजी घेणे गरजेचे आहे.

**अशी घ्या जनावरांची काळजी**

गोठ्यामध्ये थंड हवा खेळती राहावी यासाठी शक्य असल्यास पंखा लावावा.

हवामानपूरक गोठे असावेत. आतील भिंतींना पांढरा रंग लावावा. छतावर तुरट्या, कडबा, वनस्पतींचा पालापोचाळा अंथरावा. आहारात नियमित ३० ते ५० ग्रॅम मिठाचे खडे किंवा खनिजक्षार मिश्रण द्यावे. त्यामुळे उन्हाळ्यात आवश्यक क्षार मिळतात. दूध काढण्यापूर्वी थंड पाण्याने धुतल्यास शरीराचे तापमान कमी होते. दूध उत्पादन वाढते. जनावरांच्या अंगावर दिवसातून दोन-तीन वेळा थंड पाणी फवारावे.

# दुधिया मालदा आंब्याची विशेषत:



आंबा हा ‘फळांचा राजा’ आहे हे आपल्या सर्वांना माहीतच आहे. त्यातच हापूस आंबा म्हटले की ‘देशाची शान’ असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. पण भारतात हापूस व्यतिरिक्त आंब्याच्या प्रजाती आहेत ज्या त्यांच्या चवीमुळे आणि वेगळेपणा मुळे प्रसिद्ध आहे. अशाच एका आंब्याच्या प्रजातीचे नाव आहे ‘दुधिया मालदा’. गंगेच्या पाण्यातून मिळालेला अमृतसर असे या आंब्याचे वर्णन करण्यात येते. बिहारमधील पाटण्यातील या आंब्याची चव आणि गोडवा इतकी अप्रतिम आहे की एकदा या आंब्याची चव घेणारा या आंब्याला विसरू शकत नाही असे म्हणतात. दुधिया मालदा आंबा आतून मऊ आणि रसाळ आणि अप्रतिम गोडवा असलेला आहे. या आंब्याचा गर मऊ आणि दुधासारखा असतो. त्यामुळेच याला ‘दुधिया मालदा’ असे नाव मिळाले आहे. या आंब्याची साल पातळ आणि हलकी असते. त्यामुळे तो खाण्यास खूप सोयीस्कर असतो. दुधिया मालदा आंब्याचा सुगंध इतर आंब्यांपेक्षा वेगळा आणि आकर्षक असतो. दुधिया मालदा आंब्याची सर्वात अनोखी गोष्ट म्हणजे त्याला दुधातून सिंचन केले जाते.

‘दुधिया मालदा’ आंब्याचा इतिहास : लखनऊचे नवाब फिदा हुसेन यांना दूध आणि आंब्याची खूप आवड होती. त्यांनी पाटण्यातील दिघा येथे दुधाचे सिंचन केलेले आंब्याचे रोप लावले होते. या आंब्याला ते दुधाने सिंचन करत होते. यातून अनेक दिवसांनी ‘दुधिया मालदा’ नावाची अद्भुत प्रजाती तयार झाली.

दुधिया मालदा आंब्याची लोकप्रियता : दुधिया मालदा आंबा आजही तितकाच लोकप्रिय आहे.

गेल्या वर्षी ३३ देशांमध्ये हे आंबे निर्यात करण्यात आले होते. अमेरिका, इंग्लंड, जपान, दुबई अशा अनेक देशांमध्ये हा आंबा आवडीने खाल्ला जातो. विदेशातून दरवर्षी या आंब्याची ऑर्डर येते. हा आंबा जून मध्ये पिकतो आणि १०० रुपये किलो दराने विकला जातो.

# फरदड कापूस उत्पादनासाठी करा योग्य जातीची लागवड

कापूस हे महाराष्ट्रासहित देशातील अनेक राज्यांमध्ये उत्पादित होणारे एक महत्त्वाचे नगदी पीक आहे. याची लागवड राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये केली जाते. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील बहुतांशी जिल्ह्यात कापसाची लागवड केली जाते. राज्यातील काही शेतकरी कापसाचे फरदड उत्पादन घेतात. यामुळे अनेकांच्या माध्यमातून फरदड उत्पादन घ्यायचे असल्यास, कोणत्या वाणाची लागवड केली पाहिजे? याबाबत जाणून घेतले पाहिजेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात फरदड कापूस उत्पादन घेतले जाते ही वास्तविकता नाकारून चालणार नाही. शेतकरी सांगतात की, फरदड कापूस उत्पादनामुळे त्यांना अधिकचा खर्च न करता कापसाचे अतिरिक्त उत्पादन मिळवता येते. यामुळे हे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरते. आज आपण शेतकरी कापसाचे फरदड उत्पादन घेत असतील तर त्यांनी कोणत्या वाणाची निवड केली पाहिजे? जेणेकरून त्यांना चांगले उत्पादन पण मिळेल आणि त्यांचे नुकसान कमी होईल.

कोणता वाण निवडला पाहिजे?

कापसाचा कबड्डी हा वाण फरदड उत्पादनासाठी देखील खूपच फायदेशीर आहे.



खरे तर हा वाण महाराष्ट्रात खूपच लोकप्रिय आहे. या जातीची राज्यातील मराठवाडा आणि विदर्भ विभागात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. या जातीची सर्व प्रकारच्या जमिनीत लागवड करता येणे शक्य आहे. तसेच बागायती आणि कोरडवाहू भागात हा वाण लागवडीसाठी चालतो. याचा पीक परिपक्व कालावधी हा १६० दिवस ते १८० दिवस यादरम्यानचा आहे.

या जातीच्या कापूस बोंडाचा आकार मोठा असतो. एका बोंडाचे वजन ५.३० ग्रॅम ते सहा ग्रॅम एवढे भरते. याची सर्वात मोठी विशेषता म्हणजे फरदड उत्पादनासाठी उत्कृष्ट आहे. या जातीवर हवामान बदलाचा देखील फारसा विपरीत परिणाम होत नाही ही याची आणखी एक मोठी विशेषता. दुष्काळी स्थितीत तसेच जास्तीच्या पावसाच्या परिस्थितीत देखील या जातीच्या कापसापासून समाधानकारक उत्पादन मिळत असल्याचा दावा काही शेतकऱ्यांनी केला आहे. ही जात शेतकऱ्यांच्या पसंतीस खरी उतरली असून गेल्यावर्षी या जातीच्या कापूस बियाण्याची मोठ्या प्रमाणात काळाबाजारी झाली होती. यामुळे शेतकऱ्यांना चढ्या दरात या जातीच्या कापसाच्या बियाण्याची खरेदी करावी लागली होती.

# गंगातीरी गाय देते १० ते १६ लिटर दूध



तुम्ही कधी गंगातीरी गायीबद्दल ऐकले आहे का? जर तुम्ही पशुपालनाचा व्यवसाय करत असाल तर तुम्हाला या गायीबद्दल चांगली माहिती असेल. वास्तविक, ही गाय उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये खूप प्रसिद्ध आहे. या गायीची खासियत जाणून घेतल्यावर तुम्ही थक्क व्हाल. गंगातीरी गायीचे पालन करणाऱ्या पशुपालकांच्या मते, ती एका दिवसात १० ते १६ लिटर दूध देते. एवढेच नाही तर या गाईचे इतरही अनेक गुणधर्म आहेत.

गंगातीरी गाय ही देशी जातीची गाय आहे. या जातीच्या गायी मुख्यतः उत्तर प्रदेश आणि बिहारच्या जिल्ह्यांमध्ये दिसतात. हे प्रामुख्याने उत्तर प्रदेशातील मिर्झापूर, वाराणसी, गाझीपूर आणि बलिया जिल्ह्यांत आणि बिहारच्या रोहतास आणि भोजपूर जिल्ह्यात आढळते. उत्तर प्रदेशात गंगातीरी गायींची संख्या सुमारे २ ते २.५ लाख आहे. ही गाय देखील इतर सामान्य गायींसारखी दिसते. पण ते ओळखणे खूप सोपे आहे. या जातीच्या गायी तपकिरी आणि पांढर्या रंगाच्या असाव्यात, जसे आपण आधी सांगितले आहे. गंगातीरी गाईचा रंग तपकिरी आणि पांढरा असतो. किती असते किंमत? याशिवाय या गायींची शिंगे लहान आणि टोकदार असतात. जे दोन्ही बाजूंनी पसरलेले आहेत. या गायींचा रंग पांढरा शुभ्र किंवा राखाडी-पांढरा आढळतो. मध्यम आकाराचे डोके,

मस्तकावर उभार असतो. पापण्या, तोंड आणि खुर काळ्या रंगाचे असतात. त्याच वेळी या गायीचे कान थोडेसे खालच्या दिशेने वाकलेले असतात. या जातीच्या बैलांची उंची सुमारे १४२ सें.मी. तर गायीची उंची १२४ सें.मी. गंगातीरी गायींचे वजन सुमारे २३५-२५० किलो असते.

या जातीच्या गायी बाजारात खूप महाग विकल्या जातात. त्यांची किंमत ४० ते ६० हजार रुपयांपर्यंत आहे.

# सानेन जातीची शेळी देते सर्वाधिक दूध

शेतीला जोडधंदा म्हणून बरेच शेतकरी पशुपालन व्यवसाय करतात. पशुपालन व्यवसायामध्ये शेळीपालन हा एक कमी खर्चिक व्यवसाय आहे. शेतकरी वर्गाला शेळीपालन व्यवसाय परवडतो. तसेच व्यावसायिक शेळीपालनातून चांगले उत्पन्न मिळू शकते. परंतु शेळीपालन व्यवसाय यशस्वी होण्यासाठी शेळ्यांच्या उत्तम जातींची निवड करता येणे खूप आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर आज आपण ‘शेतकऱ्यांचे एटीएम’ समजल्या जाणाऱ्या सानेन शेळीबद्दल अधिक माहिती जाणून घेणार आहोत. सानेन जातींच्या शेळ्यांचे मुळस्थान स्वित्झर्लंड आहे. आता युरोप, अमेरिकेपासून अफगाणिस्तानात ही शेतकरी या शेळ्या मोठ्या प्रमाणात पाळत आहेत. सानेन जातीच्या शेळीचा गाबन काळ फक्त पाच महिन्यांचा असतो. त्यामुळे पाच ते सहा वेते सहज मिळू शकतात. या जातीच्या शेळीपासून एका वेतात कधी दोन तर कधी तीन करडे मिळतात. तीन वेतात पाच करडे मिळू शकतात. इतर गावठी शेळ्यांच्या तुलनेत गाभण राहण्याचे या जातीचे प्रमाण अधिक आहे.



वातावरणाशी घेते जुळवून : सानेन शेळी त्यांच्या आकर्षक पांढर्या रंगासाठी आणि विविध हवामानाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाते. ज्यामुळे सानेन शेळी जगभरातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक लोकप्रिय पर्याय होत आहे. सानेन जातीची शेळीमध्ये दिवसाला पाच ते बारा लिटर दूध देण्याची क्षमता आहे. ज्यात फॅटचे प्रमाण सुमारे ३-४ टक्के असते. ज्यामुळे ही शेळी उच्च-गुणवत्तेत दुधाची विश्वसनीय शेळी झाली आहे.

सानेन जातींच्या शेळ्यांची वैशिष्ट्ये : या जातीच्या शेळ्या कोणत्याही प्रकारच्या हवामानात सहज तग धरू शकतात. ज्वारीचा कडबा, मका, अशा पारंपरिक चाऱ्यावर देखील या शेळ्यांचे पालन करता येते. सर्व प्रकारच्या खाद्याचे, गवताचे आणि अपारंपरिक खाद्याचे दूध, मांस आणि कातडी मध्ये रूपांतर उत्तम पद्धतीने करतात. या शेळ्यांची रोग प्रतिकार शक्ती चांगली असून विविध आजरांस लवकर बळीपडत नाही. शेळ्या दुरवर रानात, डोंगर कपाऱ्यात करण्यास जाऊ शकतात. तसेच कमीत कमी भांडवली गुंतवणूक व्यवस्थापन करणे सहज शक्य असते. कोणत्याही वातावरणाशी समरस होण्याची नैसर्गिक क्षमता असल्यामुळे कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या निवाऱ्याची गरज नसते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे ’पेनी ब्लॅक’ नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील ’आयफेल टॉवर’चे उद्धाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचयित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या ’युरो टनेल’चे उद्धाटन झाले.
१९९७ : ’बँक ऑफ इंग्लंड’ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष १९६४: अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे ’गांधी-आयर्विन’ कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकर्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया मॉँटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा ’मॉँटेसरी’ या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक.
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य.
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.

# जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी अंबाजोगाई शहरात दिव्यांग मतदार जनजागृती रॅली

अंबाजोगाई। प्रतिनिधी

देशात सध्या लोकसभा निवडणुक जाहीर झाली असून काही ठिकाणी मतदान देखील पार पडले आहे. मात्र जिथे जिथे लोकसभेचे मतदान झाले आहे त्याठिकाणी अत्यंत कमी प्रमाणात मतदान झाले आहे. मतदानाची टक्केवारी अत्यंत खालावली आहे. ही खालावलेली मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार अंबाजोगाई शहरात दिव्यांग रॅलीचे आयोजन करण्यात आले.



बुधवार दि.०१ मे रोजी जिल्हाधिकारी बीड व समाज कल्याण अधिकारी बीड यांच्या आदेशानुसार दिव्यांग मतदार जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले. या रॅलीची सुरुवात गटशिक्षण अधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथून करण्यात आली. अंबाजोगाई चे तहसीलदार विलास तरंगे यांनी या दिव्यांग रॅलीस हिरवा झेंडा दाखवला. दिव्याग मतदानाचा टक्का वाढावा या उद्देशाने जन जागृती रॅली चे आयोजन केले होते. रॅली सकाळी गटशिक्षण अधिकारी कार्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे सावरकर चौक, बस स्थानक येथून तहसील कार्यालय अंबाजोगाई येथे येऊन रॅलीची सांगता करण्यात आली. याप्रसंगी सचिन देशपांडे नायब तहसीलदार, शेख सर गटशिक्षण अधिकारी, स्मिता बाहेती नायब तहसीलदार, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर सुवर्णकार, समन्वयक नेरकर, अप्पासाहेब चव्हाण - नोडल अधिकारी, दिव्यांग जनजागृती कक्ष आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम व नियोजनबद्ध रॅलीसाठी जिल्हा परिषद प्रशाला शिवाजी चौक चे मुख्याध्यापक जोगदंड सर, हेमंत शिनगारे, विजय रापतवार, सर्व शिक्षा अभियानचे शिंदे सर, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी चे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, ओमकेश दहिफळे, जगदीश जाजू, संतोष मोहिते, धनराज सोळंकी व त्यांचे सर्व सदस्य त्याचबरोबर मानव विकास अपंग शाळेचे मुख्याध्यापक इंद्रकुमार लोढा, बोधावर्धिनी मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक टी.पी. चव्हाण , अहिल्यादेवी मूकबधिर मुलींच्या विद्यालयाचे मुख्याध्यापक मस्के सर, ज्ञानवर्धीनी मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक रामराव घुगे, कर्तव्य मतिमंद मुलींचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती चौधरी मॅडम, बाबासाहेब परांजपे, अपंग विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण मॅडम, मानव विकास मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंत टाकळकर, दिव्यांग शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तसेच संचालक जगधने सर, कदम सर यांनी सहकार्य केले.

दिव्यांग मतदार जनजागृती रॅलीच्या समारोप कार्यक्रमात तहसीलदार विलास तरंगे बोलताना म्हणाले की, सार्वत्रिक लोकशाहीचा महोत्सव खऱ्या अर्थाने साजरा करण्यासाठी व मतदान करून घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मतदार जनजागृती करण्यासाठी मानवी साखळी निर्माण करण्याच्या हेतूने जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याचे तहसीलदार तरंगे यांनी यावेळी नमूद केले. अंबाजोगाई शहरातील सर्व दिव्यांग शाळातील कर्मचारी यांनी उत्साहात सहभाग नोंदवून दिव्यांगांना सुद्धा शंभर टक्के मतदान करून घेण्याची हमी त्यांनी याप्रसंगी दिली. शहरात मतदार जनजागृती होऊन लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान करून घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असेही त्यांनी आवर्जून स्पष्ट केले. गटशिक्षणाधिकारी शेख यांनी सुद्धा मतदार जनजागृती अभियान प्रभावीपणे राबवून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

मतदान म्हणजे लोकशाहीचा सण असतो यामध्ये सर्वांनी मोठ्या उत्साहात सहभागी व्हावे व मतदान करून लोकशाही मजबूत करावी आदेही आवाहन शिक्षणाधिकारी शेख यांनी केले. दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांनी मतदार जनजागृती रॅली साठी केलेले सहकार्य महत्त्वपूर्ण असल्याचे शेख यांनी नमूद केले. या मतदार जनजागृती रॅलीमध्ये रोटरीचे जगदीश जाजू, जिल्हा परिषद शिक्षक केंद्रे , मुख्याध्यापक आनंद टाकळकर आदींनी आपले मतदार जागृती बाबत विचार मांडले. उपस्थित सर्व जणांनी मतदार जनजागृती बाबत घोषणा देऊन उत्साह वाढवला .या रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणावर दिव्यांग बांधव व्हील चेअरवर बसून सहभागी झाले होते.

# माजलगावला डान्सिंग स्कूल होणे गौरवाची बाब -पोटभरे

माजलगाव। प्रतिनिधी



बीड जिल्ह्याच नव्हे तर मराठवाड्यात अनेक नाट्यकलावंत अभिनय, चित्रपट कलाकार, कवी, साहित्यिक सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात निर्माण होताना दिसत असून, माजलगाव सारख्या ग्रामीण भागात सुद्धा आता डान्सिकल स्कूल निर्माण होणे ही माजलगावकरांसाठी गौरवाची बाब आहे, असे गौरवद्गार अंबिशन डान्सिंग स्कूलचे उद्घाटन प्रसंगी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केले.

दि.१ मे २०२४ रोजी माजलगाव येथे अंबिशन डान्सिंग स्कूल स्थापने प्रसंगी ते बोलत होते. या भागातील डान्स किंवा नृत्य कलावंतांना आपली कला दाखवण्याची व नृत्य कलेत निपुण होण्यासाठी हे अंबिशन डान्सिंग स्कूल फार मोठी ंधी निर्माण करून देण्याचे काम करणार असल्याचे डान्सिंग स्कूलच्या संचालिका सोनाली बोरकर, लखन निसर्गंध, निकिता गायकवाड यांनी सांगितले. या अंबिशन डान्सिंग स्कूलचे उद्घाटन बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्या ममताताई शिंगाडे या होत्या. तर स्वागत अध्यक्ष म्हणून शारदाताई डोईजड, शितलताई हजारे या होत्या. प्रमुख उपस्थिती डॉक्टर सोळंके, शिक्षक नेते आश्रुबा पोटभरे जिजा, श्रीहरी मोरे, नवनाथ धायजे, अविनाश बनसोडे, राजेश साळवे, भैय्या प्रधान यांची होती. जी.टी. पोळ सर, बी एन गायकवाड सर, अशोक लांडगे सर, आर्यन कंधारे मॅडम आदी उपस्थित होते. सोळंके हॉस्पिटल वरील दुसऱ्या मजल्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी सुरू करण्यात आलेल्या या अंबिशन डान्सिंग स्कूलमध्ये विशेष करून झुंबा एरोबिक्स, योगा डान्स तसेच डान्स स्टाईल मध्ये हिप हॉप, बॉलीवूड, भरतनाट्यम, लावणी, फ्री स्टाईल, क्लासिक, पॉम्पिंग क्रंम्प इत्यादी डान्स चे प्रकार शिकवले जातील, असे संचालकांनी सांगितले. या सर्व नृत्य कलेचा उपयोग शहरातील नवकलावंतांनी घ्यावा व आपल्या नृत्य कलेमध्ये निपुण होण्यासाठी जास्तीत जास्त नवकलाकारांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गटनिर्देशक भरत बलुतकर यांचा सेवागौरव सोहळा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील भरत बलुतकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोनपेठ येथून गटनिर्देशक या पदावरून प्रदीर्घ २८ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा सेवागौरव सोहळा अंबाजोगाई मध्ये त्यांच्या मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आला होता.

परभणी, मुदखेड, लातूर, सोनपेठ येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये त्यांनी आपली सेवा पूर्ण केली आहे. त्यांचे शिक्षण बीएफए,एटीडी झालेले असून फोटोग्राफीचेही शिक्षण झालेले आहे. त्यांनी आपल्या कुंचल्यातून अनेक महापुरुषांची उत्तम व आकर्षक छायाचित्रे रेखाटलेली आहेत. ज्ञानदानाचे कार्य करत असताना त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांशी स्नेहाचे संबंध निर्माण केले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय नजरेसमोर ठेवून वृक्ष लागवड व पर्यावरणाचे संवर्धन हे उपक्रम त्यांनी आपल्या सेवाकाळात राबविले. त्याबद्दल त्यांना विविध सामाजिक संस्थांचे पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. परभणी येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कार्यरत असताना त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संस्थेचा संपूर्ण परिसर ग्रीन बेल्ट करून विविध झाडांच्या वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवून संपूर्ण परिसर हिरवागार केला होता. त्याबद्दल त्यांना परभणी महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त राहुल रेखावार यांच्या हस्ते पर्यावरण मित्र हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. त्यांनी आपल्या सेवाकाळात अनेक विद्यार्थी घडविले. त्यांनी घडविलेले अनेक विद्यार्थी टाटा, महिंद्रा यासारख्या नामांकित कंपनीमध्ये नोकरी करत आहेत. नाशिक येथे मरीन उद्योग, हिंदुस्थान एॅरोनॉटिक या विमान स्पेअर पार्ट तयार करणाऱ्या कंपनीमध्येही त्यांचे काही विद्यार्थी कार्यरत आहेत. विविध नामांकित कलरच्या कंपन्यांमध्ये सुद्धा यांचे विद्यार्थी महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. भरत बलुतकर यांच्या सेवा गौरव सोहळ्यानिमित्त प्राचार्य सी.सी. देशपांडे, आकडे सर, पांडे सर लातूर, व्ही डी काळे सर, छापरवाल सर परभणी, श्रीमंत ओव्हाळ सर उस्मानाबाद, अमृतवार सर, लाखे सर, नांदेड पुजारी सर, आसद सर, परळी दिलीप दारव्हेकर सर, पतंगे सर आखाडा बाळापूर, अंबाजोगाई येथील युवा नेते अक्षय भैया मुंदडा, राजकिशोरजी मोदी अध्यक्ष पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक अंबाजोगाई, रमण सोनवळकर, संचालक योगेश्वरी शिक्षण संस्था, संचालक अरुण काळे, भाजपाचे नगरसेवक सुरेश कराड, नगरसेवक मनोज लखेरा, दिलीप काळे, अॅड मकरंद पत्की अध्यक्ष दीनदयाळ नागरी सहकारी बँक, संजय सत्वधर मार्केटिंग कमिटी चेअरमन झर, पुंड साहेब वनविभाग परभणी, रमेश राठोड साहेब, बालाजी धगडे साहेब पुणे, सुरेंद्र देशपांडे स्टेट बँक हैदराबाद परभणी, डॉ. केतन सत्वधर मानवत ,कल्याण काळे साहेब रिलायंस इन्शुरन्स, योद्धा ग्रुपचे सर्व सदस्य, अनेक विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. तसेच त्यांचे वर्गमित्र, अंबाजोगाई शिक्षणक्षेत्रातील मान्यवर तसेच शहरातील उद्योजक, नगरसेवक, राजकीय पक्षांचे नेते, पाहुणेमंडळी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री गजानन विजय ग्रंथाचा चार दिवसीय सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासून श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण, भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला येथे करण्यात आले आहे. या चार दिवसीय उत्सवात श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण, भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सव सोहळा संपन्न होणार आहे. सर्व भावीकभक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

ह.भ.प.वै दत्तात्रय जोशी महाराज नळेगाव यांच्या आशीर्वादाने हभप.श्री आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासून श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण, भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. मंडळाचे हे १२ वर्ष असून, ३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला अंबाजोगा येथे करण्यात आले आहे. चैत्र कृ शु १० शुक्रवार ३ मे २०२४ रोजी पहाटे ४ वा मंगलध्वनीने सुरवात होणार असून, पहाटे ५ वा श्रींना रुद्राभिषेक व आरती, सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण - अध्याय १ ते ७,दु ४ वा भक्तीसंगीत मातृस्वर संगीत विद्यालय व समुह अंबाजोगाई सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प.लक्ष्मीप्रसाद बुवा पटवारी, माजलगाव यांचे सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन होणार आहे. तर



शनिवार ४ मे पहाटे ५ वा श्रींना रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अध्याय ८ ते १४ त्यानंतर आरती, दु ४ वा भक्तीसंगीत, स्वररंग संगीत विद्यालय - शैलेश पुराणिक, तालस्पर्श तबला अकादमी - रत्नदिप शिगे व पोस्टमास्तर भागवत पाठक यांची बासरी वादन होणार असून, सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प. बाळु बुवा नाव्हेकर गंगाखेड यांचे होणार आहे. रविवार ५ मे रोजी पहाटे रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० अध्याय १५ ते २१ त्यानंतर ग्रंथपुजन, ग्रंथदिंडी, पारायणारती, सायंकाळी ६ वाजता श्री गजानन महाराजांचा पालखी उत्सव सोहळा श्री योगेश्वरी मंदीर - मंडी बाजार - पाटील चौक - जयवंती पुला पासुन - कुंभार गल्ली -श्रीगणेश साई मंदीर - मंगळवार पेठ - गुरवार पेठ मार्गेश्री योगेश्वरी मंदीरात येणार आहे. ६ मे पहाटे रुद्राभिषेक व आरती, सकाळी १० वा काल्याचे किर्तन : ह.भ.प. श्री शाम महाराज नेरकर(शास्त्री) त्यानंतर महाआरती व महाप्रसादङ्गसायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई संचलित, सत्संग श्री गजाननाचा व ''श्रींची'' दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता श्री योगेश्वर मंदीर हॉल येथे होणार आसुन भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई यांच्या च्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया पारदर्शक

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शकरित्या पार पाडली जात आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत ३९- बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८.०४.२०२४ ते दि. २५.०४.२०२४ या कालावधीत एकूण ९९ नामनिर्देशनपत्र प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या नामनिर्देशनांची छाननी दिनांक २६.०४.२०२४ रोजी जिल्हा नियोजन सभागृहात करण्यात आली. या छाननीसाठी उपस्थित राहण्याबाबत सर्व नामनिर्देशन भरणा-या उमेदवारांना लेखी स्वरूपात कळविण्यात आले होते.

दिनांक २६.०४.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निवडणूक निरीक्षक(सा) अजीमुल हक व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, यांचे उपस्थितीत छाननी सुरु करण्यात आली. यावेळी उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी व प्रस्तावक उपस्थित होते. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१, निवडणूक संचालक नियम १९६१, निवडणूक निर्णय अधिकारी यांची हस्तपुस्तिका व भारत निवडणूक आयोग यांचेकडील संबंधित आदेशातील तरतुदींचे तंतोतंत पालन करून छाननीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. छाननीमध्ये एकूण ५५ उमेदवारांचे ७२ अर्ज वैध तर १९ उमेदवारांचे २७ अर्ज अवैध ठरविण्यात आले. अवैध ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कारणमीमांसा देऊन सविस्तर आदेश पारित करण्यात आले. अर्ज अवैध ठरलेल्या १९ पैकी संजय काशिनाथराव काळे व यशवंत उत्तरेश्वर गायके या दोन अर्जदारांनी नामनिर्देशनपत्र रद्द करण्याच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. संजय काशिनाथ काळे यांचे नामनिर्देशनपत्र अपूर्ण असल्यामुळे ते अवैध ठरविण्यात आले. याबाबत संजय काळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून नामनिर्देशपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली. सुनावणीअंती उच्च न्यायालयाने संजय काळे यांची याचिका खारिज केली आहे. त्याचप्रमाणे यशवंत उत्तरेश्वर गायके यांनी दाखल केलेले शपथपत्र अपूर्ण होते. सुधारित शपथपत्र दि. २६.०४.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत दाखल करणेबाबत त्यांना लेखी नोटीस देण्यात आली होती. त्यांनी सुधारित शपथपत्र दाखल केले परंतु, सुधारित शपथपत्रसुद्धा परिपूर्ण नसल्याने त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला होता. या निर्णयाविरूद्ध श्री गायके यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ही याचिकासुद्धा खारिज केली आहे. ३९-बीड लोकसभा मतदारसंघातील सर्व निवडणूक प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शकपणे पार पाडण्यात येत आहे. दि. १३ मे २०२४ रोजी होणा-या मतदान प्रक्रियेमध्ये सर्व मतदारांनी सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन, जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले आहे.

# लिंबागणेश येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे दि.३० मंगळवार रोजी राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते सकाळी पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. तथागत भगवान गौतम बुद्ध,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष अरूण निर्मळ यांनी उपाध्यक्ष अमोल वक्ते यांनी सुत्रसंचलन केले.सोनु निर्मळ यांनी आभारप्रदर्शन केले.या कार्यक्रमात महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका संघटित व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन देशातील उपेक्षित समुहातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठवण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे प्रतिपादन सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले.

सायंकाळी फुलांनी आणि निळ्या ध्वजांनी सजवलेल्या जीप मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भालचंद्र माध्यमिक विद्यालय पासुन सुरूवात करत संपूर्ण गावातुन संगीत वाद्यांच्या गजरात मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. भिमगीतांवर वाद्यांच्या तालावर तरूणाईने ठेका धरला भिमसैनिक आबालवृद्ध महिला पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जयंती निमित्त वृक्षारोपण, रक्तदान शिबीर तसेच व्याख्यान, गायनाच्या विविध कार्यक्रमांचे ३ दिवसीय आयोजन करण्यात आले आहे.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३८/२०२४**

**कृष्णा पि. बाबासाहेब भोसले विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, देविबाभुळगाव ता. जि. बीड**

**पहा कृष्णा पि. बाबासाहेब भोसले रा. देविबाभुळगाव ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत धोंडिबा तुकाराम पारडे** यांचा दिनांक १५/१०/१९०२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास देविबाभुळगाव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे देविबाभुळगाव ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०६/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित

**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३६/२०२४**

**रोहन पि. मच्छिंद्र काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

**पहा रोहन पि. मच्छिंद्र काशिद रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत नानाभाऊ बापु काशिद** यांचा दिनांक १५/०१/१९४० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०६/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित

**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३६/२०२४**

**नारायण पि. सर्जेराव उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा नारायण पि.सर्जेराव उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत तुकाराम पि. भगवानराव उबाळे** यांचा दिनांक १०/०३/१९२० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०६/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित

**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३८/२०२४**

**परमेश्वर पि. लक्ष्मण ढास विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, घारगाव/सुलतानपुर ता. जि. बीड**

**पहा परमुश्वर पि. लक्ष्मण ढास रा. घारगाव/सुलतानपुर ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत भिवाजी पि.बाबाजी ढास** यांचा दिनांक ०५/०४/१९११ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास घारगाव/सुलतानपु ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे घारगाव/सुलतानपु ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०६/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित

**तहसिलदार, बीड**

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

शुक्रवार दि.३ मे २०२४



# पंकजाताई मुंडेंच्या प्रचारार्थ परळी मतदारसंघांत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीचे कार्यकर्ते सरसावले

### कॉर्नर बैठका, अन् घरोघरी मतदारांना प्रत्यक्ष भेटून काढत आहेत ग्रामीण भाग पिंजून; लेकीसाठी जीवाचे रानं करु; विक्रमी मताधिक्य देण्याचा मतदारांचा निर्धार

**परळी । प्रतिनिधी**

भाजपा-महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ भाजप, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीच्या प्रमुख पदाधिकार्यांनी विधानसभा मतदारंसघनिहाय प्रचार यंत्रणा गावोगावी सक्रिय केली असून मतदारसंघ पिंजून काढला आहे. महायुतीचे घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तसेच शिवसेना, रासप, रिपाइं, मनसे या सर्व पक्षांच्या प्रमुख पदाधिकार्यांनी मतदार संघातील जिल्हा परिषद सर्कलनिहाय गावा-गावातील घरोघरी जावून मतदारांपर्यंत पोहचले आहेत. ठिकठिकाणी मतदारांचा पंकजाताईंच्या नेतृत्वाला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'लेकीसाठी जीवाचे रान करु; विक्रमी मताधिक्य देवू' असा निर्धार मतदारांनी व्यक्त केल्याने महायुतीच्या पदाधिकार्यांचा प्रचाराचा उत्साह आणखी दुणावला आहे.





पंकजाताई मुंडे यांच्यासाठी महायुतीचे शहर व ग्रामीण भागातील कार्यकर्ते कंबर कसून कामाला लागले आहेत. शहरा पाठोपाठ गेल्या तीन दिवसांपासून ग्रामीण भागात त्यांनी प्रचाराचा जोर वाढवला आहे. महायुतीचे पदाधिकारी ठिकठिकाणी बैठका, गाठीभेटी,पदयात्रा काढत असून याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कार्यकर्ते गावा-गावात जावून पंकजाताईंचे बीड जिल्ह्याचे विकासाचे व्हिजन हे पदाधिकारी मतदारांना सांगत त्यांना विकसित बीड जिल्ह्यासाठी पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. भाजपला मत म्हणजे विकासाला मत आहे हे सूत्र समोर ठेवून तुम्ही सर्व सुज्ञ मतदारांनी पंकजाईंना एक संधी द्यावी असे आवाहन केले जात आहेत. दरम्यान आपली लेक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार या भावनेतून गावोगावच्या ग्रामस्थांत समाधान व्यक्त होत असून विक्रमी मताधिक्य देवू असा विश्वास मतदार देत आहेत.

तालुक्यातील सिरसाळा, पिंपरी, दादाहरी वडगाव, धर्मापूरी, जिरेवाडी, नागापूर तसेच अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर, बर्दापूर, पट्टीवडगांव, राडी आदी जिल्हा परिषद गटात या पदाधिकार्यांनी पंकजाताईंसाठी जोरदार प्रचार सुरु केला आहे. घरोघरी जावून मतदारांशी प्रत्यक्ष संवाद हे पदाधिकारी साधत आहेत. ठिकठिकाणच्या गावांमध्ये पंकजाताईंना मोठे मताधिक्य देण्याचा विश्वास मतदार व्यक्त करत आहेत.

जिल्ह्याचा सर्वांगीण विकास समोर ठेवून मतदारांनी इतर कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता भाजपला मतदान करावे. तुमची प्रतिनिधी म्हणून संसदेत काम करताना पंकजाताई मुंडे या प्रत्येक मत विकासासाठी कामी लावतील. आगामी काळात जिल्ह्याच्या ठिकाणी मोठे हॉस्पिटल उभारणी करण्याबरोबरच उद्योग- व्यापार वाढवून दहा हजार तरुणांना जिल्ह्यातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पंकजाताई काम करणार आहेत.याशिवाय विकसित जिल्हा म्हणून जे-जे केंद्र सरकारच्या माध्यमातून करणे शक्य होईल ती कामे पंकजाताईंच्या माध्यमातून पुर्ण होतील. त्यामुळे येत्या १३ मे रोजी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन महायुतीचे पदाधिकारी करत आहेत.

# धनगर समाजाच्या आरक्षणासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणार : भारत सोन्नर

### बाळू मामाच्या नावाने चांगभलं म्हणत हजारो भाविकांच्या साक्षिणे मूर्तीचे प्राणप्रतिष्ठा स्थापना

**गेवराई । प्रतिनिधी**

यशवंत सेना धनगर समाजाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून आरक्षणासाठी रस्त्यावरची लढाई लढून आरक्षण मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहे आपला हक्क मिळवण्यासाठी आपल्याला सतत संघर्ष करावा लागेल करण या प्रस्थापित पुढाऱ्यांनी आपले आ आतापर्यंत खोटे आश्वासन देऊन समाजाला फसविले आहे आता येथुनपूडच्या काळात आश्वासन चालणार नाही आरक्षण देण्याची मानसिकता आमचे प्रश्न सोडविण्यासाठी ठाम पणे ताकतीने आमच्या





सोबत उभा राहणार्यांनाच मदत असेल धनगर आरक्षणासाठी शेवटच्या श्वासापर्यंत मी लढणार आहे समाजाने आपला हक्क मिळवण्यासाठी सतत माझ्या सोबत आरक्षणाच्या लढाई मध्ये सहभाग नोंदविलेल्या आहे येथुनपुढच्या काळातही ताकतीने आरक्षणाच्या लढाई मध्ये आपल्याला खांद्याला खांदा लावून ताकतीने लढावे लागेल असे यशवंत सेना धनगर समाजाचे नेते भारत सोन्नर यांनी म्हटले गेवराई तालुक्यातील रेवकी देवकी या गावात संत बाळू मामा यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा चे कार्यक्रम हजारो भाविक भक्तांच्या उपस्थिती मध्ये भव्य दिव्य सोहळा संपन्न झाला या सोहळ्यास हजरो भाविक भक्तांच्या वतीने येळकोट येळकोट जय मल्हार बाळू मामा च्या नावाने चांगभलं अश्या स्वरुपाच्या घोषणा देण्यात अल्या या प्रसंगी भाऊसाहेब नरोटे राजु ढेकळे रोहिदास सौदलकर रवी सौदलकर राजु बाबरे कृष्णा सौदलकर सुभान सय्यद नवनाथ सौदलकर राजु आष्टकर आबासाहेब चोरमले बाबु सौदलकर संभाजी चोरमले व हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

# बीड लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया पारदर्शक

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शकरित्या पार रड पाडली जात आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत ३९- बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८.०४.२०२४ ते दि. २५.०४.२०२४ या कालावधीत एकूण ९९ नामनिर्देशनपत्र प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या नामनिर्देशनांची छाननी दिनांक २६.०४.२०२४ रोजी जिल्हा नियोजन सभागृहात करण्यात आली. या छाननीसाठी उपस्थित राहण्याबाबत सर्व नामनिर्देशन भरणा-या उमेदवारांना लेखी स्वरूपात कळविण्यात आले होते.

दिनांक २६.०४.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निवडणूक निरीक्षक(सा) अजीमुल हक व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, यांचे उपस्थितीत छाननी सुरु करण्यात आली. यावेळी उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी व प्रस्तावक उपस्थित होते. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१, निवडणूक संचालक नियम १९६१, निवडणूक निर्णय अधिकारी यांची हस्तपुस्तिका व भारत निवडणूक आयोग यांचेकडील संबंधित आदेशातील तरतुदींचे तंतोतंत पालन करून छाननीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. छाननीमध्ये एकूण ५५ उमेदवारांचे ७२ अर्ज वैध तर १९ उमेदवारांचे २७ अर्ज अवैध ठरविण्यात आले. अवैध ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कारणमीमांसा देऊन सविस्तर आदेश पारित करण्यात आले.

अर्ज अवैध ठरलेल्या १९ पैकी संजय काशिनाथराव काळे व यशवंत उत्तरेश्वर गायके या दोन अर्जदारांनी नामनिर्देशनपत्र रद्द करण्याच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात पान ३ वर

# अखेर बृजभूषण यांचा पत्ता कट, मुलगा करणभूषणला भाजपचे तिकीट

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

महिला कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेले उत्तरप्रदेशातील खासदार बृजभूषण शरण सिंह यांचे तिकीट भाजपने कापले आहे. त्यांच्या जागेवर त्यांचे पुत्र करण भूषण सिंह यांना कैसरगंज मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष राहिलेले बृजभूषण शरण सिंह यांच्यावर कुस्तीपटू बजरंग पुनिया साक्षी मलिक, विनेश फोगाट, संगीता फोगाट यांच्यासह अनेक कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप केले होते. या सर्व कुस्तीपटूंनी बृजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात नवी दिल्लीत धरणे आंदोलनही केले होते. त्यांनतर बृजभूषण शरण सिंह यांच्या अध्यक्षतेखालील भारतीय कुस्ती महासंघाची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली होती. पश्चिम उत्तरप्रदेशात राजपूत



ठाकूर समाजाचे वर्चस्व आहे. या समाजातील ५ नेते राज्याचे मुख्यमंत्री होते. दोन नेत्यांनी पंतप्रधान पदापर्यंत मजल मारली होती. बृजभूषण हे सुद्धा ठाकूर समाजाचे नेते आहेत. कैसरगंजसह आसपासच्या ६ लोकसभा मतदारसंघांवर त्यांचा प्रभाव आहे. भाजपने उत्तरप्रदेशातील २७ लोकसभा मतदारसंघात ठाकूर समाजाच्या एकाही उमेदवाराला तिकीट दिलेले नाही. गाझियाबाद येथून व्ही. के. सिंह यांचेही तिकीट पान ३ वर

# पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मताचा पाऊस बजरंग सोनवणेवर पडणार -कवडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील शेतकरी इंडिया महाविकास आघाडीच्या बाजूने मत करणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकार द्वारे सांगितले. भाजप सरकारच्या काळामध्ये शेतकरी आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे खचला आहे खताचे भाव गगनाला पोहोचले परंतु मालाचे भाव कमी करून शेतकऱ्यावर एक प्रकारे अन्याय केला कांदा या पिकाला निर्यात बंदी केली, सोयाबीनचे भाव वाढू नयेत याची प्रमाणिक काळजी घेतली, डिझेल ६० रुपयावरून १०० वर नेले याचा परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक नियोजनावर झाला. नांगरट १२०० वरून २००० भाव झाला



शेतात पाळी घालण्यासाठी ४०० रुपये एकरी वरून १००० रुपयांवर गेली, पेरणी ७०० वरून १५०० वर गेली, महिलांसाठी गॅस टाकीची योजना आणून प्रत्येक घरामध्ये गॅस टाकी दिली आणि त्याचा भाव ४०० वरून ११०० नेला, दैनंदिन जीवनामध्ये जीवनावश्यक लागणाऱ्या वस्तूवर जीएसटी बसवली, सोन्याचा भाव ४००० वरून ७८०० वर गेला शेतकऱ्यांना मुला बाळांच्या लग्नामध्ये सोनं घेणं अशक्य झालं हे सरकार शेतकऱ्याच्या बाजूच नसून भांडवलदार लोकांच आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी निर्णय घेतला इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर मताचा पाऊस पडणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी सांगितले.

# प्रकाश आंबेडकरांची सभा निर्णयाक मतं खेचणार

### आंबेजोगाईतील सभेला प्रचंड संख्येने उपस्थित रहा - अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये बीड जिल्ह्याला विशेष महत्त्व प्राप्त आहे परंतु बीड जिल्ह्याची दुसरी ओळख आहे भूमिहीन शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार, ऊसतोड मजुरांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहेत. दिग्गज नेते व महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे नेते असतानाही जिल्ह्यात आपल्या मागचे कार्यकर्ते हे कार्यकर्तेच राहावे यासाठी मोठे-मोठे उद्योग आणले नाहीत हे दुर्दैव आहे.



अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी बीड जिल्ह्याचे निरीक्षण केल्यानंतर वर्षानुवर्ष घराणेशाही पद्धतीने सत्ता असल्यामुळे या ठिकाणी नवीन उद्योग व्यवसाय उभे करण्यात आले नाहीत याला शह देण्यासाठी वंचित, शोषित, पीडित लोकांच्या न्याय हक्कासाठी झटणारा, मराठा, मुस्लिम, धनगर समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे वंचित बहुजन आघाडीच्या मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील (कुणबी मराठा) यांना उमेदवारी पान ३ वर

# वोट देणार : सोबत नोटही देणार!

### राडी सर्कलमधील ग्रामस्थांनी केला अशोक हिंगे यांना विजयी करण्याचा संकल्प

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणूक वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची ग्रामीण भागामध्ये दिवसेंदिवस क्रेझ वाढू लागली असून आता तर नागरिकांनी नोट बरोबर वोटही देणार! असा संकल्प करीत अशोक हिंगे पाटील यांना बीड लोकसभा निवडणुकीत विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. याची सुरुवात राडी सर्कलमधील ग्रामस्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मधील शिल्लक राहिलेली देणगी २१ हजार रुपये अशोक हिंगे



पाटील यांना निवडणुकीसाठी देणगी म्हणून देऊन केली आहे.

बीड लोकसभा निवडणुकीमध्ये दुरंगी लढत होणार असल्याच्या वल्गना केल्या जात असल्या तरी ही लोकसभा निवडणूक तिरंगी होणार असल्याचे आता नागरिकांमधून बोलले जात आहे. अशोक हिंगे पाटील यांची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली असून नागरिकांनीच अशोक हिंगे पाटील यांना विजयी करण्यासाठी प्रचार सुरू केला असल्याचे चित्र सर्वत्र दिसू लागले आहे. याचाच एक भाग म्हणजे अशोक हिंगे पाटील हे अंबाजोगाई तालुक्यातील राडी सर्कल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण करण्यासाठी गेले असता येथील ग्रामस्थांनी अशोक हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करत अशोक हिंगे पाटील यांना निवडून देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. वोट तर देणारच त्याबरोबरच नोटही देणार! असे म्हणत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीमधील पान ३ वर

# समनक जनता पार्टी लोकसभेचा पाठिंबा देण्याबाबत आपली भूमिका तीन दिवसात जाहीर करणार

**बीड । प्रतिनिधी**

भटक्या विमुक्त आणि उपेक्षित समाजासाठी कार्यरत असणार्यांना एकत्र आणत आम्ही समनक पार्टीची स्थापना केली असून समनक जनता पार्टी या पक्षाचा उद्देश आरक्षण आणि गोर-गरीब समाजाला संरक्षण असा आहे. आम्ही त्याकरीता निवडणुक लढवत आहेत परंतू बीड मध्ये रविकांत राठोड यांना उमेदवारी दिली असता त्यांनी कुठलीही कल्पना पक्षाला न देता तसेच मी अपक्ष उभा होतो, असे माध्यमांशी खोटे बोलून आमचा आणि नागरिकांचा विश्वासघात केला



आहे. त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही होईल. त्यांना ज्या कोणत्या पक्षाने हे करायला लावले त्यांच्यावर देखील आम्ही कार्यवाही करु आणि ३ ते ४ दिवसांत समनक जनता पार्टी आता बीडमध्ये कोणाला पाठिंबा द्यायचा याची भूमिका जाहीर करेल, असे समनक जनता पार्टीचे अध्यक्ष संपत चव्हाण यांनी बुधवार दि.०१ मे रोजी बीड येथे ही माहिती दिली. यावेळी पत्रकार परिषदेला राष्ट्रीय अध्यक्ष संपत चव्हाण यांच्यासह, यवतमाळ-वाशीम मतदारसंघाचे उमेदवार प्रा.डॉ.अनिल राठोड, विभागीय अध्यक्ष भगतसिंग राठोड, संजय पवार. सुभाष राठोड वडवणी. अप्पासाहेब राठोड, दिलीप जाधव, डि.एम.राठोड, रमेश चव्हाण, अरविंद चव्हाण, संजय राठोड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे त्यांनी पत्रकार परिषदेत म्हटले की, आम्ही यावेळी ७ जागा लढवत होतो/आहेत यामध्ये हिंगोली, नांदेड, धाराशिव, यवतमाळ- वाशिम, जालना आणि बीड अशा जागा असून आम्ही पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महाराष्ट्र दिनानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून राष्ट्रध्वजास मानवंदना

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पोलीस कवायत मैदान येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

कार्यक्रमास विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष



पाटील आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी पोलीस दल, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण दलाच्या संयुक्त संचलनाची पाहणी केली. यावेळी झालेल्या शानदार संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी जिल्ह्यातील जनतेला महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मतदान करण्याची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाला वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

# मित्राकडून तरुणीसोबत अश्लील कृत्य, फोटो व्हायरल करण्याची धमकी

**पुणे । प्रतिनिधी**

तरुणीसोबत मैत्रीकरुन तिला फिरायला नेऊन तिच्यासोबत अश्लील कृत्य करुन फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली. मोबाईलमधील फोटो व व्हिडीओ डिलीट करण्यास सांगण्यासाठी गेलेल्या तरुणीच्या दोन भावांना सहा जणांनी काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केले. हा प्रकार फेब्रुवारी २०२० पासून सोमवार (दि.२९ एप्रिल) दरम्यान हवेली तालुक्यातील होळकर वाडी येथे घडला आहे. याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत १९ वर्षीय तरुणीने मंगळवारी (दि.३० एप्रिल) लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन महेश सुनील खरात (वय-२४), मंगेश सुनील खरात (वय-२०), सुनील खरात (वय-५०), प्रशांत खरात (वय-२४) व दोन महिला (सर्व रा. होळकर वाडी, ता. हवेली) यांच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ३७६, ३५४, ३२४, ३२३, ५०६, ३४ सह पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महेश खरात याने पीडित मुलगी अल्पवयीन असताना २०२० मध्ये मैत्री केली. मुलीला फिरण्यासाठी उरुळी देवाची येथील पिंजन वस्तीतील रानमळा येथे घेऊन गेला. त्याठिकाणी मुलीसोबत अश्लील चाळे करुन शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तसेच मुलीचा वारंवार पाठलाग करुन शरिरसुखाची मागणी केली. आरोपीच्या या कृत्यामुळे तरुणीने त्याच्यासोबत बोलणे बंद केले.

आरोपी महेश याने मुलीकडे शरीरसुखाची मागणी करुन संबंध प्रस्तापित केले नाही तर तिचे फोटो व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. आरोपीच्या मोबाईलमध्ये असलेले मुलीचे फोटो डिलीट कर असे सांगण्यासाठी तिचे दोन भाऊ आरोपीच्या घरी गेले. त्यावेळी आरोपींनी मुलीच्या दोन्ही भावांना लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण करुन अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमुद केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बिराजदार करीत आहेत.

# पिंपरी विधानसभा मतदारसंघातर्फे काळेवाडी येथील विवाह सोहळ्यात मतदान जनजागृती

**पुणे । प्रतिनिधी**

विवाह सोहळ्यात भटजींनी मंगलाष्टकांऐवजी सर्वांना दिलेली मतदान करण्याची शपथ...वधू-वरांनी लग्नाचे फेरे घेण्यापूर्वी हातात धरलेला मतदान जनजागृतीचा संदेश आणि अक्षदा टाकण्यापूर्वी उपस्थित वऱ्हाडी मंडळींनी घेतलेली मतदान करण्याची शपथ... बुधवारी काळेवाडी येथील थोपटे लॉन्स मंगल कार्यालयात शुभम गोरे आणि प्रणिता सोनके यांच्या विवाह सोहळ्यात असे आगळे-वेगळे दृष्य पहावयास मिळाले. पिंपरी विधानसभा मतदारसंघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या मतदान जनजागृती कार्यक्रमात उपस्थित वऱ्हाडी मंडळीने मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे यांच्या निर्देशानुसार तसेच मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या नियंत्रणाखाली




पिंपरी विधानसभा कार्यालयामार्फत मतदान जनजागृती करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात येत असून त्याअंतर्गत या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या लग्नसोहळ्यात विवाहविधी सुरू होण्यापूर्वी मतदान शपथेचे वाचन करण्यात आले. विवाह सोहळ्यात उपस्थित असलेल्या आम्ही लोकशाहीवर निष्ठा ठेवून प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म,जात, वंश,समाज किंवा भाषा यांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करण्याची शपथ घेतली. १०० टक्के मतदान करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला आणि नंतर विवाहसोहळ्यास सुरूवात झाली. यावेळी पिंपरी विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, नोडल पर्यवेक्षक राजेंद्र कांगुडे आदी उपस्थित होते. नवविवाहीत वधूवरांनी देखील भेटीस आलेल्या सर्व नातेवाईक,पाहुणे आणि उपस्थितांना लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन केले.

# कोयत्याचा धाक दाखवत गुंडगिरी करणारा तडीपार; इतर दोघांवर मोक्काअंतर्गत कारवाई; चिखली पोलिसांची कामगिरी

**पिंपरी - चिंचवड । प्रतिनिधी**

चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दहशत पसरविणाऱ्या आदर्श उर्फ सोन्या विठ्ठल लुडेकर याला तडीपार करण्यात आले आहे. सोन्या हा चिखली परिसरात व्यावसायिकांसह इतरांना धमकवत गुंडगिरी, दादागिरी करायचा. त्याच्या दहशतीमुळे अनेक नागरिक त्रस्त झाले होते, मात्र पुढे येऊन पोलिसात तक्रार देत नव्हते. अखेर त्याला चिखली पोलिसांनी दोन वर्षांकरिता तडीपार केले आहे. चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत दादागिरी आणि गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. असा इशारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांनी दिला आहे.

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील गुन्हेगारी कमी करण्याच्या उद्देशाने अनेक पावले उचललेली आहेत. त्यांचा चौबे पॅटर्न शहरात चंजलाच जगला आहे व त्याचे परिणाम देखील गाव गुंड्यांवर पाहायला मिळत आहे. लोकसभा






निवडणुकीत काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरातील सराईत गुन्हेगारांचा बंदोबस्त केला जात आहे. चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत आदर्श उर्फ सोन्या विठ्ठल लुडेकर या सराईत गुन्हेगाराला चिखली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांनी तडीपारचा प्रस्ताव तयार करून तो पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांनी पारित करून दोन वर्षांकरिता दहशत पसरविणाऱ्या आदर्श उर्फ सोन्या विठ्ठल लुडेकर याला पिंपरी- चिंचवड, पुणे पोलीस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामीण हद्दीतून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे.

गुन्हेगार सोन्याची स्वतःची गँग आहे. तो त्याद्वारे गुंडगिरी आणि दादागिरी करायचा. त्याच्यावर चिखली पोलीस ठाण्यात जबरी चोरी, अवैधरित्या शस्त्र बाळगणे, जमाव जमा करणे, गंभीर दुखापत करणे अशा प्रकारचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे अखेर चिखली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांनी तडीपारचा प्रस्ताव पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांच्याकडे पाठवला होता.

दोन सराईत गुन्हेगारांवर मोक्काअंतर्गत कारवाई

कोयत्याचा धाक दाखवून लूटमार करणाऱ्या प्रकाश उर्फ गणेश नामदेव श्रीगोंड आणि साथीदार महादेव दुन्डप्पा दिंडुरी या दोघांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पैकी प्रकाश उर्फ गणेश नामदेव श्रीगोंड याच्यावर चिखली, भोसरी, वाकड, सोलापूर दक्षिण या परिसरात जबरी चोरी, चोरी, घरफोडी, धारदार शस्त्र बाळगणे असे एकूण १८ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या साथीदारावर दहा गुन्हे दाखल आहेत. चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिसरात दहशत पसरवणाऱ्या या दोघांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत चिखली पोलिसांनी तीन गुन्हेगारी टोळ्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई केलेली आहे.

# संविधान वाचवण्यासाठी काँग्रेसला निवडून द्या : अरविंद शिंदे यांचे प्रतिपादन

पुणे : भारतीय जनता पक्षाचा संविधान बदलण्याचा अजेंडा सगळ्यांसमोर आलेला आहे. यंदाच्या निवडणुकीत बहुमत मिळाल्यानंतर संविधान बदलणे हा त्यांचा प्राधान्यक्रम राहणार आहे , त्यामुळे सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणाऱ्या भारतीय संविधानाला वाचवण्यासाठी काँग्रेस पक्षाला निवडून देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पुणे शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केले.

काँग्रेस भवन येथे आंबेडकरी चळवळीत काम करत असलेल्या विविध पक्ष संघटनांच्या प्रतिनीधींच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यामध्ये रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे, सुवर्णा




डंबाळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे अशोक जगताप, रिपब्लिकन जनशक्तीचे शैलेंद्र मोरे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जीवन घोंगडे, रिपब्लिकन चे आनंद कांबळे, माजी नगरसेवक अजित दरेकर यांचे सह काँग्रेस अनुसूचित जातीचे शहराध्यक्ष सुजित यादव उपस्थित होते. आंबेडकरी जनता कायम वैचारिक भूमिका घेत आलेली असून यंदाच्या वर्षी संविधानाला असलेला धोका स्पष्टपणे जाणवत आहे त्यामुळे कोणतेही भावनिक व सामाजिक दडपण न स्वीकारता आंबेडकरी चळवळीतील बहुतांश कार्यकर्ते हे भाजपच्या पराभवासाठी काँग्रेस पक्षासमवेत तसेच देशपातळीवर इंडिया आलाय समवेत काम करत आहेत अशी भूमिका उपस्थित सर्वच मान्यवरांनी व्यक्त केली.

### १०० वस्ती मधून संविधान रथ फिरणार

दरम्यान पुणे लोकसभा मतदारसंघातून दलित , मागासवर्गीय तसेच आंबेडकरी समुदायाची जास्तीत जास्त मते रवींद्र धंगेकर यांना मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असून यासाठी सुमारे १०० वस्ती मधून संविधान रथ फिरवण्यात येणार आहे असे देखील यावेळी ठरवण्यात आले आहे.दरम्यान राहुल गांधी यांच्या तीन तारखेच्या सभेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन सभा यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवड उपनगरात विजेच्या समस्यांनी नागरिक हैराण

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून पिंपरी-चिंचवड शहरातील उपनगरात विजेच्या समस्यांनी नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे महावितरणच्या कारभारावर संताप व्यक्त करत असून, या विरोधात कुठे आंदोलन तर, कुठे निवेदन देऊन तक्रारी करण्यात येत आहेत. चिखली, मोई, मोशी, निगडी, आकुर्डी आणि भोसरी भागात महावितरणच्या समस्या भेडसावत आहेत. शहरातील अनेक ठिकाणी नागरिक थेट महावितरण अधिकाऱ्यांना भेटून तक्रारींचा पाढा त्यांच्यासमोर वाचत आहेत.

मोशी व चिखली परिसरात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे याबाबत कायमस्वरूपी तोडगा न काढल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. तसेच, अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला होता. महावितरणच्या अधिकारी खडबडून जागे झाले. चिखली आणि मोई या दोन्ही गावांना एकाच वीज वाहिनीद्वारे वीजपुरवठा केला जातो. विजेचा ताण वाढल्याने तसेच मोई परिसरातील खाणीत शेकडो क्रशर आहेत. त्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून करण्यात आल्या आहेत. एकदा वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत करण्यासाठी दोन ते तीन तासांचा कालावधी लागत आहे. रात्री-अपरात्री कधीही वीजपुरवठा खंडित होत असल्याने आणि सध्या उष्णता वाढल्याने नागरिक उकाड्याने हैराण होत आहेत.

चिखली परिसरातदेखील अनेक लहान-मोठे लघुउद्योग आहेत. खंडित वीज पुरवठ्यामुळे लघुउद्योगांचे कामकाज बंद पडत आहे. या सर्व परिस्थितीवर ग्रामस्थांनी तसेच परिसरातील युवा नेत्यांनी महावितरणच्या विरोधात आंदोलन अन्? मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. त्याचप्रमाणे वाकड, थेरगाव परिसरातदेखील वारंवार वीज समस्या भेडसावते. सकाळी महापालिकेकडून पाणी येण्याच्या वेळेस नेमकी वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात पाण्यामुळे नागरिक हैराण झालेले आहेत. जुन्या व जीर्ण झालेल्या केबल्स आणि वाढता ताण यामुळे ही समस्या होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

### नागरिकांची इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळून खराब

आकुर्डी परिसरात योग्य क्षमतेने वीजपुरवठा होत नसल्यामुळे विजेचा होल्टेज कमी-जास्त होत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे टीव्ही, फ्रिज यांसारखे अनेक उपकरणे खराब होत आहे. त्याचप्रमाणे दत्तवाडी, विठ्ठलवाडी, एकतानगर, क्रांतीनगर टेल्को कपूर, कॉलनी आकुर्डी गावठाण या सर्व परिसरामध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. परिसरातील कोणत्या भागात रस्त्याचे काम सुरू असेल किंवा आणखी काही खोदकाम चालू असेल त्या ठिकाणी खोदकाम करत असताना एखादी अंडरग्राउंड वायर डॅमेज झाली किंवा तुटली तर अधिकाऱ्यांकडून लवकर दखल घेतली जात नाही. नागरिक वीज बिलाचा भरणा नियमित करतात. त्याचप्रमाणे महावितरण विद्युत विभागाने नागरिकांना वीजपुरवठा ही नियमित पुरवावा. आमच्या तक्रारीची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणीचे पत्र विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने निखिल दळवी यांनी कार्यकारी अभियंता भोसरी विभागाला दिले आहे.

# पंडित रामकृष्णबुवा वझे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अल्फा इव्हेंटस् तर्फे रविवारी सांगीतिक कार्यक्रम



**पुणे । प्रतिनिधी**

ग्वाल्हेर घराण्याचे ख्यातकीर्त गायक, संगीतकार कै. पंडित रामकृष्णबुवा वझे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अल्फा इव्हेंटस् ?तर्फे रविवारी (दि. ५) सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रम दि. ५ मे रोजी सकाळी १० वाजता मयूर कॉलनीतील शाकुंतल कलामंदिरात आयोजित करण्यात आला आहे. दृक-श्राव्य माध्यमातून पंडित वझेबुवा यांची गायनाची झलक रसिकांना ऐकायला मिळणार असून डॉ. चैतन्य कुंटे वझेबुवांच्या गायन शैलीविषयी विवेचन करणार आहेत. वझेबुवा यांचे शिष्य पंडित भास्करबुवा जोशी यांच्याकडून अपर्णा पणशीकर यांनी गायनाची तालीम घेतली असून पंडित जोशी यांच्याकडून शिकायला मिळालेल्या बंदिशी त्या सादर करणार आहेत. लीलाधर चक्रदेव (संवादिनी), प्रणव गुरव (तबला) साथसंगत करणार आहेत, अशी माहिती अल्फा इव्हेंटस् ?चे संचालक निखिल जोशी यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# भीमा नदीकाठावरील दारूभट्टीवर पोलिसांचा छापा

**खेड । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील शेलपिंपळगाव येथे भीमा नदीच्या काठावर सुरु असलेल्या एका दारूभट्टीवर पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट तीनने छापा मारून कारवाई केली. या कारवाई मध्ये पोलिसांनी पाच हजार लिटर दारू बनवण्याचे कच्चे रसायन आणि ३१५ लिटर तयार दारू नष्ट केली. ही कारवाई बुधवारी (१ मे) दुपारी दोन वाजता करण्यात आली.

राहुल राजपूत, प्रद्युम्न राठोड (दोघे रा. शेलपिंपळगाव, ता. खेड) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार सुधीर दांगट यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### पाच हजार लिटर कच्चे रसायन आणि ३१५ लिटर हातभट्टीची दारू नष्ट

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी बेकायदेशीरपणे भीमा नदीच्या काठावर दारूभट्टी लावली. याबाबत माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखा युनिट तीनने दारूभट्टीवर छापा मारून कारवाई केली. यामध्ये पोलिसांनी एक लाख रुपये किमतीचे पाच हजार लिटर कच्चे रसायन आणि १५ हजार ७५० रुपये किमतीची ३१५ लिटर तयार दारू नष्ट केली. चाकण पोलीस तपास करीत आहेत.

# बैलगाडी विहिरीत कोसळून बैलाचा मृत्यू; बैलगाडी चालक सुखरुप बचावला

ओतूर : एकाच बैलाची गाडी जुंपून जनावरांना चारा आणायला निघालेली बैल अज्ञात आवाजाला घाबरून बिचकल्याने व बैलाने मुसंडी मारल्याने बैलासह गाडी अचानक सुमारे ६० ते ७० फूट खोल असलेल्या विहिरीत कोसळली. या घटनेत बैल जागेवरच गतप्राण झाला असून प्रसंगावधान राखीत बैलगाडी चालक तरुण शेतकऱ्याने विहिरीत कोसळणाऱ्या बैलगाडीतून वेळीच बाहेर उडी मारल्याने तो तरुण शेतकरी सुदैवाने बचावला.



ही दुर्घटना खामुंडी (ता. जुन्नर) येथील शेतकरी दिपक ज्ञानेश्वर कोकाटे यांच्या मालकीच्या सोमनाथ नगर तेलदरा येथील शिवारातील विहीरीवर बुधवारी (दि. १) सायंकाळी ६:३० वाजण्याच्या दरम्यान घडली. दीपक कोकाटे यांचा मुलगा प्रणव कोकाटे (वय २२) असे बचावलेल्या तरुणाचे नाव आहे. केवळ दैव बलवत्तर म्हणून हा तरुण वाचल्याची चर्चा परिसरात आहे. आजूबाजूच्या काही शेतकऱ्यांच्या झालेली दुर्घटना लक्षात आल्यावर प्रथम सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके यांना संपर्क केला. बोडके यांनी आळेफाटा येथील क्रेन मालक कैलास पुरी यांना संपर्क करून तात्काळ क्रेनला पाचरण करण्यात आले. शेतकरी दिपक कोकाटे आणि मुलगा बाबू कोकाटे यांनी क्रेनच्या सहाय्याने खाली विहिरीत काळोखात उतरून तसेच खामुंडी गावातील तरुणांच्या मदतीने अथक प्रयत्न करून बैलाचा मृतदेह आणि बैलगाडी रात्री १:३०च्या सुमारास विहिरीबाहेर काढण्यात यश मिळविले आहे. या दुर्घटनेत शेतकऱ्याचे सुमारे ३५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून शेतकऱ्याचा आत्मा असलेला व जिव्हाळ्याचे नाते असलेला एक उमदा बैल गमावल्याचे दुःख शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.